दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.२८ मे २०२५ | वर्षे४थे | अंक२८२वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



# १४० गावच्या शेतकऱ्यांचा लोकलढा!

तांदळा उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली | शेतकऱ्यांतून होवू लागली चिंता व्यक्त | शासन-लोकप्रतिनिधींनी दखल घ्यावी | अरे चोरांनो शेतकरी पोशिंदा, त्यांच्याकडे लक्ष द्या?

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जायकवाडी धरणाचे पाणी वंचित भागातील शेतकर्यांना मिळावे, यासाठी गेवराई तालुक्यातील तांदळा येथे अजय पाटील साळुंके गेल्या रविवारपासून दिवसांपासून उपोषण करीत आहेत. मंगळवारी त्यांची प्रकृती खालावल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. या उपोषणाची दखल लोकप्रतिनिधी व शासनाने घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

जायकवाडी धरणाचे पाणी सिंदफणा पट्ट्यातील शेतीला मिळावे यासाठी १४० गावातील शेतकऱ्यांना लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाचा दुसरा टप्पा तांदळा येथे रविवारपासून सुरू असून अजय पाटील साळुंके हे उपोषणाला बसले आहेत. उपोषणामुळे त्यांच्या शरीरातील साखरेचे प्रमाण कमी झाले आहे. त्यातच त्यांना साखरेचा आजार असल्याने शेतकऱ्यांतून चिंता व्यक्त होत आहे. त्यांनी उपचार घ्यावे यासाठी तांदळा ग्रामस्थ व बाहेर ठिकाणहून आलेले शेतकरी त्यांना आग्रह करीत आहेत.

मात्र शासन जो पर्यंत मागण्या मान्य करीत नाही तो पर्यंत उपचार घेणार नसल्याची भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यांच्या प्रकृतीला काही त्रास होऊ नये, यासाठी शासनाने या आंदोलनाची दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. याच दरम्यान चकलांबा पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांनी उपोषणस्थळी भेट देऊन पाटील यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

### नादुरुस्त यंत्राने तीनदा तपासणी

मंगळवारी मादळमोही येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचारी तपासणीसाठी आले होते. मात्र, पाटील यांची रक्तातील साखर अधिक दाखवली, ही शंका पाटील यांना वाटल्याने त्यांनी पुन्हा दोनवेळा साखर तपासली. यावेळी सदर ग्लूकोमीटर नादुरुस्त असल्याचे डॉक्टरांनी मान्य केले. यासह यावेळी पल्स तपासण्याचे यंत्रही खराब असल्याचे दिसून आल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला.

### नादुरुस्त यंत्राने तीनदा तपासणी

शेतपाण्याची तरतूद नाही,मग पाणी मिळणार कसे: गुळवे

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, हे सोमवारी नांदेड येथे आले होते. येत्या पाच वर्षांत मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेतून मराठवाड्यातील शेतीला पाणी देऊ, असे म्हणाले. मात्र, मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेतीसाठी पाणी देण्याची तरतूद नाही, या योजनेतून शेतीला पाणी ही तरतूद वगळली आहे, असे असल्याचे या योजनेतून शेतीला पाणी कसे मिळणार असा प्रश्न लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे यांनी उपस्थित केला आहे. शिवाय मराठवाडा वॉटर ग्रीड योजनेत शेती व उद्योगांना पाणी द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

# भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू

सवाल:आयआरबीची लापरवाही सहा युवकांच्या मुळावर



पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई:धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई नजीक गढीजवळ भीषण अपघातात सहा जणांचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला. अपघाताची ही घटना सोमवारी (दि.२६) रात्री ११.०० वाजेच्या सुमारास घडली. माहिती मिळताच गेवराई पोलिस आणि महामार्ग पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिकांच्या माहितीनुसार, आयशर टेम्पोने टोचन करुन नेण्यासाठी चारचाकी वाहनाजवळ थांबलेल्या सहा जणांना भरधाव वेगात धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर टेम्पो सोडून चालक फरार झाला होता या प्रकरणी चालकाविरुद्ध गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, गेवराई येथील एका वाहनाला अपघात झाला होता. हे वाहन टोचन करुन आणण्यासाठी गेवराईतील बाळासाहेब आतकरे, भागवत परळकर, सचिन नन्नवरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव आणि दिपक सुरय्या यांच्यासह इतर जन वाहन टोचन करुन आणण्यासाठी गढी कारखान्यानजिक गेले होते. तिथे वाहन टोचन करण्यासाठी महामार्गावर ते उभे असताना बीडहून छत्रपती संभाजीनगरकडे जाणार्या भरधाव आयशर टेम्पोने चारचाकी वाहनाजवळ थांबलेल्या सहा जणांना जोराची धडक दिली, त्यामध्ये या सहा जणांचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी » पान २ वर



### मनोज जरांगे पाटीलांकडून सांत्वन

घटनेची माहिती मिळताच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मयत सहा युवकांच्या कुटुंबीयांना भेट देऊन सांत्वन केले व जखमी युवकाला गेवराई येथील रुग्णालयात भेट दिली. आम्ही तुमच्या दुःखात सामील आहोत व या अपघाताबाबत व मयतांच्या पाल्याबाबत सरकारशी बोलणी करतो असे आश्वासन दिले

### उड्डाण पुलावर आयआरबीचे लाईट बंद असल्याने अपघात

सदर बंद पडलेली कार ही उड्डाणपूलावर होती व ती कार आणण्यासाठी या युवकांचा प्रयत्न होता यावेळी उड्डाणपूलाच्या बाजूने असणाऱ्या दोन्ही साईटचे पोल वरील लाईट बंद होते त्यामुळे चालकाला उड्डाण पुलावर दुरून हे युवक दिसले नसल्याची चर्चा आहे. आय आर बी चे लाईट चालू असते तर कदाचित हा अपघात तळला असता असे मत प्रथमदर्शं व्यक्त करत आहे.

# आष्टीकरांना अवकाळीचा जोरदार तडाखा

अस्मानी:कसारीत वीज कोसळुन तीन जनावरे दगावली

पुण्यभूमी प्रतिनिधी


कडा:मागील पंधरा दिवसांपासून लागून राहिलेल्या अवकाळी पावसाने चांगलाच तडाखा दिला असून, वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने कासारी (ता. आष्टी) येथील नरहरी काशिनाथ बन यांच्या अंगणात वीज कोसळून त्यांच्या गोठ्यातील तीन जनावरे दगावल्याची घटना सोमवारी सायंकाळी घडली.

आष्टी तालुक्यात गेल्या पंधरा दिवसापासून मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने कहर केला असून, सोमवारी सायंकाळी झालेल्या जोरदार पावसाने तालुक्यातील कासारी येथे अंगणात वीज कोसळून नरहरी काशिनाथ बन यांच्या गोठ्यातील एक गाभण गायीसह दोन वगारी दगावल्याची घटना घडली. महसूल विभागाचे तलाठी बनगे यांनी घटनास्थळी भेट देऊन या घटनेचा पंचनामा केला. आष्टी तालुक्यात कधी दिवसा तर कधी रात्री अशा अनियमित स्वरूपातील पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, शेतकऱ्यांची खरीपपूर्ण कामे खोळंबली आहेत.



# पाकिस्तानमध्ये गरिबी वाढली

देशविदेश: जागतिक बँकेचा अहवान



इस्लामाबाद : वृत्तसंस्था

भारताच्या कुरापती काढणा-या पाकिस्तानची अर्थव्यवस्था सध्या भिकेला लागली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि इतर जागतिक संस्थांकडून कोट्यवधी डॉलर्सची आर्थिक मदत मिळत असूनही, पाकिस्तानची परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. महागाईच्या भयंकर परिणामामुळे लोकांना दोन वेळच्या जेवणासाठीही संघर्ष करावा लागत आहे. पाकिस्तानमधील ही वाढती गरिबी जागतिक बँकेच्या नवीन अहवालाने उघड केली आहे.या अहवालात गरिबी वाढण्याचे प्रमुख कारणही दिले आहे. विशेष म्हणजे, जागतिक बँकेकडून जून महिन्यात पाकिस्तानसाठी २० अब्ज डॉलर्सची रक्कम मंजूर होण्याची चर्चा सुरू असतानाच हा अहवाल समोर आला आहे.

पहलगाम हल्ल्यानंतर भारतासोबतच्या वाढलेल्या तणावादरम्यान हे जगभरात स्पष्ट झाले आणि जागतिक बँकेलाही याची गंभीर दखल घ्यावी लागली. त्यामुळे, पाकिस्तानला १ अब्ज डॉलर्सच्या अतिरिक्त आर्थिक मदतीसह बेलआउट (बेलआउट पॅकेज) मंजूर झाल्यानंतर लगेचच, ११ नवीन अटी » पान २ वर

# पुण्यभूमीच्या वृत्ताने प्रशासन जागे

दणका:तीर्थक्षेत्राची जागा मोकळी करण्यासाठी तहसीलदार गावात


## तीर्थक्षेत्राची जागा मोकळी करा!
चर्चा:प्रशासनान झोपेचं सोंग घेऊन गप्प
पुण्यभूमी प्रतिनिधी
केज:केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तीर्थक्षेत्र परीसरात मोठी अडचण निर्माण

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज तालुक्यातील चिंचोली माळी येथे तीर्थक्षेत्र परीसरात मोठी अडचण निर्माण झाली आहे तरी ग्रामस्थांना काय करायचे ते समजत नाही तरी केज तहसीलदार साहेब राकेश गिट्टे साहेब यांनी श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील जागा खाली करून » पान २ वर



शिवसेनेने मदतीचा हात दिला ! | आ. मिलिंद नार्वेकर यांच्याकडून लाखमोलाची मदत

# पावसाने कांद्याचा चिखल झाला

पुण्यभूमी प्रतिनिधी

कडा:महिन्यातच पावसाने घातलेल्या धुमशानाने विकण्यासाठी तयार असलेल्या कांद्याचा चिखल केला आहे. या कांद्याच्या चिखलात स्वतःचे भविष्य शोधणाऱ्या चिमुकल्या 'प्रगती'ची अस्वस्थता निर्वावलेल्या सरकारला दिसली नाही; पण शिवसेना आमदार मिलिंद नार्वेकर यांनी प्रगतीच्या भविष्यासाठी लाखमोलाची मदत करून तिच्या स्वप्नांना नवे पंख दिले!

मुसळधार अवकाळी पावसाने कांदा उत्पादकांचे बेहाल केले. बाजारात विकण्यासाठी तयार असलेल्या कांद्याचा तुफान पावसाने चिखल केला. आष्टी आलुक्यातील शिंदेवाडी येथील महेश दरेकर यांनी पावसाला सुरुवात होण्यापूर्वीच तीन एकरातील कांदा वाळवून विक्रीसाठी तयार केला होता. मात्र पावसाने तीनशे गोण्या कांदा भिजला. या चिखलात महेश दरेकर यांची सहा वर्षांची प्रगती चांगले कांदे शोधतानाचे दृश्य पाहून अवघा महाराष्ट्र हळहळला. 'कांदा विकून तुला शाळेत जाण्यासाठी नवीन दफ्तर, गणवेश, पुस्तके घेऊन देतो...' असा शब्द वडिलांनी प्रगतीला दिला होता. » पान २ वर





मी केलेल्या मदतीने दरेकर कुटुंबाचे नुकसान भरून येणारे नाही याची मला कल्पना आहे. पण त्यांना आधार देण्याचा हो छोटासा प्रयत्न आहे.

– आ. मिलिंद नार्वेकर

पावसाने कांद्याचा चिखल झाल्यावर आम्ही नाउमेद झालो होतो. पण आमदार मिलिंद नार्वेकर यांनी दिलेल्या मदतीमुळे आम्हाला नवी ऊर्जा मिळाली आहे, दिलासा मिळाला आहे.

–महेश दरेकर,कांदा उत्पादक शेतकरी शिंदेवाडी ता. आष्टी

# आज १ वाजेपर्यंत परळी बंद

आदरांजली: व्यापारी महासंघाचे व्यापाऱ्यांना आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:माजी आमदार आर. टी. देशमुख उर्फ जिजा यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने परळीकरांनी एक जनसामान्यांचा आधारवड गमावला आहे. त्यांच्या निधनाने संपूर्ण शहरात शोककळा पसरली असून विविध स्तरातून शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहेत.

या पार्श्वभूमीवर आज बुधवार, दिनांक २८ मे रोजी सकाळी ११ वाजता त्यांना अंतिम श्रद्धांजली अर्पण करून अंत्यविधी पार पडणार आहे. या वेळी शहरातील व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन विविध व्यापारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा, मनमिळावू स्वभावाचा आणि सामाजिक भान असलेल्या नेतृत्वाचा आदर म्हणून आज दुपारी १ वाजेपर्यंत परळी शहरातील संपूर्ण व्यापारपेठ बंद ठेवण्यात येणार आहे. शहरातील सर्व व्यापार्यांनी या निर्णयाला पाठिंबा देत देशमुख यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन व्यापारी संघटनांकडून करण्यात आले आहे.

## आला रे आला...

मोसमी पाऊस शनिवारी केरळमध्ये दाखल झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. बळिराजासाठी ही आनंदवार्ता आहे. गत दोन दिवसांपूर्वी मोसमी वा–यांची वाटचाल केरळच्या दिशेने होण्यास पोषक वातावरण असल्याचे जाहीर करण्यात आले होते. यंदा मोसमी वारे केरळमध्ये सरासरी वेळेच्या ८ दिवस आधी आणि मागील १६ वर्षांच्या तुलनेत लवकर दाखल झाले आहेत. पोषक वातावरण असल्यामुळे यंदा मोसमी वारे अंदमानमध्येही लवकर दाखल झाले होते. नेहमीच्या वेळेआधीच म्हणजे १३ मे रोजी मोसमी वारे दक्षिण बंगालचा उपसागर, निकोबार बेटे आणि दक्षिण अंदमान समुद्रात दाखल झाले होते. त्यानंतरही पोषक वातावरण असल्याने मोसमी वा–यांची वाटचाल जलद गतीने सुरू होती. मोसमी वारे केरळमध्ये २७ मे रोजी दाखल होण्याचा हवामान विभागाचा अंदाज होता. मात्र अंदाजित वेळेच्या आधी एक दिवस आधीच मोसमी वारे केरळमध्ये दाखल झाल्याचे हवामान विभागाने जाहीर केले.

मोसमी वा–यांनी शनिवारी संपूर्ण केरळ आणि तामिळनाडूचा बहुतांशी भाग व्यापून कर्नाटकच्या काही भागापर्यंत प्रगती केली आहे. याबरोबरच दक्षिण अरबी समुद्राचा संपूर्ण भाग, संपूर्ण लक्षद्वीप बेटे, पूर्व मध्य बंगालच्या उपसागराचा संपूर्ण भाग, उत्तर बंगालच्या उपसागराचा काही भाग तर मिझोरामच्या काही भागात मोसमी पाऊस एक दिवस आधीच दाखल झाला. मोसमी वा–यांनी शनिवारी गोव्यापर्यंत मजल मारली. पुढील दोन ते तीन दिवसांत मोसमी वारे संपूर्ण गोवा व्यापून महाराष्ट्रात दाखल होतील, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने व्यक्त केला आहे. केरळमध्ये मोसमी पाऊस सामान्यत: १ जूनच्या आसपास दाखल होतो. भारतीय हवामान विभागाच्या अधिकृत तारखेनुसार म्हणजेच १ जूनपूर्वी पाच दिवस आधी किंवा नंतर म्हणजे २७ मे ते ५ जून दरम्यान पावसाचे आगमन होते. यानंतर पाऊस हळूहळू देशभर पसरतो. यंदा नैऋत्य मोसमी वा–याच्या वाटचालीसाठी पोषक स्थिती निर्माण झाल्यामुळे मोसमी पाऊस वेळेत केरळमध्ये दाखल होईल, असे भारतीय हवामान विभागाने म्हटले होते. त्यानुसार केरळमध्ये शनिवारी मोसमी पाऊस दाखल झाला आहे. गतवर्षी १९ मे रोजी अंदमान–निकोबार बेटांवर नैऋत्य मोसमी वा–यांनी धडक दिली होती. त्यानंतर नियोजित वेळेआधी म्हणजे ३० मे रोजी मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला होता.

यापूर्वी २३ मे २००९ रोजी मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल झाला होता. त्यानंतर तब्बल १६ वर्षांनी शनिवार, २४ मे रोजी मोसमी पाऊस वेळेआधी केरळमध्ये दाखल झाला आहे. आता राज्यातील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. अरबी समुद्रातील कमी दाब क्षेत्राची तीव्रता वाढल्यामुळे राज्यात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर, पुणे, नांदेड, लातूर, चंद्रपूर आणि नागपूर जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच उर्वरित भागात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. राज्यात सुरू असलेल्या अवकाळी पावसाचा कहर ३० मे पर्यंत कायम राहणार आहे. राज्याच्या सर्वच भागात गत आठ दिवसांपासून मध्यम ते मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. मान्सूनच्या पावसामुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढते, भूजल आणि जलाशयांचे पुनर्भरण होते आणि खरीप हंगामातील पिकांना मोठा फायदा होतो. यंदा आयएमडीने सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तवला आहे. ज्यामुळे खरीप हंगामात पिकांचे विक्रमी उत्पादन होण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम देशाच्या शेती उत्पादनावर आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होईल.

मान्सूनचा प्रवास वेगवान असल्याने कोकण किनारपट्टीवर ३१ मे ते २ जून पर्यंत पाऊस पोहोचेल. मुंबईतही याच कालावधीत मान्सूनच्या पहिल्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. १९ मे पासून कोकण आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा जोर वाढला आहे, जो मान्सूनपूर्व पावसाचा भाग आहे. मध्य महाराष्ट्रात (पुणे, नाशिक, सातारा) आणि मराठवाड्यात २ ते ५ जून दरम्यान मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे. विदर्भात मान्सून साधारणपणे ५ ते ७ जून दरम्यान पोहोचण्याची शक्यता आहे. कारण मान्सूनचा प्रवास पश्चिमेकडून पूर्वेकडे सरकतो. यंदा मान्सूनच्या हंगामात (जून ते सप्टेंबर) सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. यंदा एल निनो परिस्थितीचा प्रभाव नसल्याने मान्सूनच्या पावसाचे प्रमाण चांगले राहण्याची अपेक्षा आहे. पुढच्या दोन दिवसांतच मान्सून महाराष्ट्रात धडकण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागात पुढील ७ दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अवकाळी पावसाचा राज्यातील ८५ तालुक्यांना फटका बसला आहे. मका, ज्वारी, भाजीपाला, संत्रा, भात, आंबा, फळपिके यांचे पावसामुळे नुकसान झाले आहे. पुढील दोन ते तीन दिवसांत मान्सून कोकणात दाखल होण्याची शक्यता आहे. कोकणात सध्या जोरदार मान्सून पूर्व पाऊस सुरू आहे.केरळ हे मान्सूनचे भारतातील प्रवेशद्वार मानले जाते. यंदा मान्सून लवकर दाखल झाल्याने सर्वसामान्यांसह शेतक–यांमध्ये सकारात्मक चित्र आहे. केरळनंतर आता काही दिवसांत मान्सूनचा प्रवेश दक्षिण आणि मध्य भारतात होणार आहे. दक्षिण कोकण आणि गोव्याच्या समुद्रकिना–यावर कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने गत दोन दिवसांपासून या भागात प्रचंड पाऊस सुरू आहे. येत्या ३६ तासांत राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मराठवाड्यात लातूरसह धाराशिव, बीड, परभणी, हिंगोलीतही शनिवारपासून दमदार पाऊस झाला. लातूर जिल्ह्यात शेतपिके, फळझाडांची मोठी हानी झाली. शेतातील पिके जागेवरच नासली आहेत. राज्यात सतत पाऊस कोसळत असल्याने शेतक–यांची खरीप मशागतीची कामे खोळंबली आहेत.

# साध्यासुध्या माणसांची प्रेरणादायी गोष्ट



चांगल्या माणसांच्या बाबतीत नेहमी चांगलचं घडत असतं फक्त त्यासाठी योग्य वेळी योग्य मार्गदर्शक मिळणं देखील तितकच महत्वाचं असतं . मुंबईतील चतुर्थ श्रेणीतील सफाई कामगारांनी पास केलेली दहावीची परीक्षा आणि त्यातून उलगडत जाणारा त्यांचा जीवसप्रवास मनाला आलेले मरगळ झटकून पुन्हा एकदा आता थांबायचं नाय  असं सांगून नवीन ऊर्जा देतो . प्रत्येक चौकोन हा चौरस नसतो त्याप्रमाणे प्रत्येक सुशिक्षित हा सुजाण नसतो हे सिनेमातील निलेश माळी सरांचे हे वाक्य खूप मार्मिक आहे . शिक्षण ही गोष्ट माणसाला सुशिक्षित बनवते परंतु शिक्षणाला अनुभव आणि जाणिवांची किनार असेल तर नक्कीच ती आपल्याला खऱ्या अर्थाने समृद्ध बनवते.

मराठी सिनेसृष्टीने आत्तापर्यंत सामाजिक वास्तवाचं ठळक प्रदर्शन करणारे अनेक सिनेमे दिले त्यापैकी 'आता थांबायचं नाय' हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे .एक जिवंत आणि वास्तववादी विषय शिक्षण या गोष्टीला केंद्रस्थानी ठेऊन जागोजागी हसवतो , रडवतो आणि अंतर्मुख होण्यास भाग पाडतो.

गटारीत उतरून काम करणाऱ्या कामगारापासून सुरू झालेले सिनेमा पुढे सिनेमा त्याचं जीवन, कुटुंब, जगण्याच्या समस्या , आरोग्य यावर हसतमुखाने मात करून छोट्या छोट्या गोष्टींमध्ये आनंद शोधत खाकी गणवेश घालून, डोळ्यात प्रचंड आस घेऊन धावणाऱ्या माणसांची प्रेणारादायी आणि दाहक गोष्ट सांगून जातो. शिक्षण हे सामाजिक जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असते परंतु जग बदलवण्याची ताकद असणाऱ्या उच्चशिक्षित शिक्षकाची व्यवस्थेने करून ठेवलेली दयनीय अवस्था सुद्धा नकळत अधोरेखित होते.

शिक्षणासाठी कुठलेही वयाचे बंधन नसते. शिक्षण फक्त व्यवसाय आणि नोकरी यासाठी नसून तुमच्यामध्ये असणारा खरखुरा माणूस जिवंत करण्यासाठी, तुमच्यातला आत्मविश्वास आणि जग बदलण्याची दृष्टी देण्यासाठी शिक्षण ही गोष्ट महत्वाची आहे हे या सिनेमात दाखवण्यात आले आहे . आपल्या समाजाने आधीपासूनचं कामाच्या स्तरावरून माणसांची विभागणी केली आहे. उच्चभ्रू आणि सुशिक्षित म्हणून मिरवणाऱ्या समाजाच्या मेंदूतील ओला आणि सुक्का कचरा साफ करण्याचे काम हा सिनेमा करतो.

उदयकुमार शिरूरकर या माणसाने प्रत्यक्ष सरकारी नोकरीत केलेला हा चमत्कार सामान्य माणसांचा व्यवस्थेवरला विश्वास दृढ करतो हे नक्कीच. खरंतर हा चित्रपट थेट मनाला भिडण्याचा कारण म्हणजे हा तुमच्या आमच्या घरातला वाटतो. सिनेमात जी पात्र आहे जे लोक आहेत ही माझ्या आजूबाजूची आहेत. त्यासाठी मी भरत जाधव, सिद्धार्थ जाधव, आशुतोष गोवारीकर, किरण खोजे, प्रवीण डाळिंबकर, प्राजक्ता हनमघर, ओम भूतकर, पर्ण पेठे, रुपा बोरगावकर, श्रीकांत यादव यांचे अभिनंदन करतो की यांच्यासारख्या कलाकारांनी साध्या माणसांना जीवंत केलंय.अरविंद जगताप यांनी नेहमीप्रमाणे वास्तववादी आणि संवेदनशील विषय उत्तम प्रकारे लिहिला असून शिवराज वायचळ यांनी ही साध्या माणसांची गोष्ट अप्रतिम पद्धतीने जिवंतपणे मांडली आहे . आता थांबायचं नाय' ही गोष्ट केवळ सफाई कर्मचाऱ्यांच्या शिक्षणापुरती मर्यादित नाही, तर एकूण शिक्षण व्यवस्था आणि माणूसपणाचीही गोष्ट आहे.

प्रा. शुभम तांगडे (जैन )
मो.८६००२७११४३

# पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा; बियाणाचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा

## डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

बीड/प्रतिनिधी

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्रामध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हमीभाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते करिता डी. एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तेते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि  पत्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.



बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ चे इष्टांक रु १७०७ कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

रौप्यमहोत्सवी सोहळ्यास उपस्थित रहावे – महादेव महाराज

बीड /प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्याचे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन व प. पू. श्री प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा होणार आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तपोनिधी, शांतीब्रह, गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे.

भव्य अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू. प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि. ०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभंग संकीर्तन सेवा दि. ०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर), दि. ०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. वा. मंडळ), दि. ०९ जून सोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, राजुरी नवगण), दि. १० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुंद काका जाटदेवळेकर, दि. ११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२  होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे.

दि १२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि. १४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे.  कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर,भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले आहे.

## पान एक वरून

**भीषण अपघातात सहा जणांचा**

होऊन इतर किरकोळ जखमी झाले आहेत. सदरील आयशर टेम्पोने नंतर त्याच घटनास्थळापासून पुढे काही जणांना धडक दिली यात अन्य दोघे जखमी झाले.  अपघातानंतर गेवराई उपजिल्हा रुग्णालयात नागरिकांची प्रचंड गर्दी झाली होती.

**पाकिस्तानमध्ये गरिबी**

लादल्या गेल्या, ज्यामुळे पाकिस्तानवर आणखी आर्थिक दबाव वाढला. सध्या पाकिस्तानवर तब्बल १३१ अब्ज डॉलर्सचे बा  कर्ज आहे, जे त्याच्या एकूण जीडीपीच्या सुमारे ४२ टक्के आहे. तर, देशातील लोक महागाई, उपासमार आणि बेरोजगारीने त्रस्त आहेत. जागतिक संस्थेने म्हटले आहे की, सामान्य विक्री कर म्हणजेच 'जीएसटी' पाकिस्तानमध्ये गरिबी वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अहवालात दावा करण्यात आला आहे की, पाकिस्तानी कुटुंबाच्या करपूर्व खर्चाच्या ७ टक्क्यांहून अधिक वाटा फक्त जीएसटी पेमेंटचा आहे. यामुळे गरीब आणि असुरक्षित कुटुंबे आणखी गरीब होत आहेत.

**पुण्यभूमीच्या वृत्ताने प्रशासन**

देण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे कारण श्री संत नामदेव महाराज म्हणजे ग्रामस्थांचे ग्रामदैवत असलेल्या देवाच्या सप्ताहाच्या ठिकाणी गावातील काही समाज कंठकांनी ऐन सप्ताहाच्या ठिकाणी मोठी अडचण निर्माण केली आहे तरी सप्ताहाच्या ठिकाणची अडचण श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसर सोडुन दुसरी कडे कुठल्याही जागी स्थापन करण्यात यावी परंतु तीर्थक्षेत्र परीसर सोडुन असे गावातील ग्रामस्थांचे धोरण आहे तरी केज तहसीलदार साहेब यांनी जातीने लक्ष घालून श्री संत नामदेव महाराज तीर्थक्षेत्र परीसरातील सप्ताहाच्या ठिकाणी अडथळा निर्माण केला आहे तो दुर करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे अशी बातमी प्रसिद्ध होताच केज तहसीलदार यांनी चिंचोली माळी येथे येऊन प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला आहे.

**पावसाने कांद्याचा चिखल** या अस्मानी संकटाने प्रगतीच्या स्वप्नावरच पाणी फेरले. ही बातमी पाहून शिवसेना आमदार मिलिंद नार्वेकर यांनी दरेकर कुटुंबाशी संवाद साधला. प्रगतीच्या शाळेच्या खर्चाचा भार आमदार नार्वेकर यांनी उचलला. त्यासाठी तात्काळ एक लाख रुपयांची मदत दरेकर कुटुंबाच्या बँक खात्यावर जमाही केली. यामुळे दरेकर कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

## पान सहा वरून

**मंत्री पंकजा मुंडेंनी केले**

त्यांच्या कुटुंबियांची देखील ना. पंकजाताई मुंडे यांनी सांत्वनपर भेट घेतली. तर नाथरा येथील जेष्ठ नागरिक स्व. वसंतराव धोंडिबा मुंडे यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. स्वामी आणि मुंडे कुटुंबियांचे सांत्वन करताना ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त करत दोन्ही कुटुंबांना धीर दिला. तसेच यादरम्यान नागापूर, नाथरा येथील ग्रामस्थ नागरिकांशी भेटून ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्याशी संवाद साधला.

**बीडच्या विद्यार्थ्यांनी मारली**

होते.कार्यक्रमात संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.के. माहेश्वरी म्हणाल्या की, आजच्या पिढीला ज्ञानाबरोबरच मूल्यांनी सक्षम करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनचे संस्थापक संचालक महाबीर सिंग म्हणाले की, २०२४–२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेत ७२ देशांमधील ४००० शहरांमधील ९६,४९९ हून अधिक शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि भिवानी हरियाणा येथील सीबीएलयूचे डीन डॉ.सतीश आर्य हे देखील कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

**चिंचोली माळी विकासापासून**

बुवाजीचे ऐकत आहेत व चिंचोली माळी गावाला विकासा पासून वंचित ठेवले ठेवले आहे तरी चिंचोली माळी ते हादगाव रोडवरुन एकदा प्रवास कारा म्हणजे समजेल मंजूर केलेला रोडचे काम कधी केले पाहिजे तसेच चिंचोली माळी सबस्टेशनला एक दिवस डीयुटी करा म्हणजे समजेल ट्रन्सफॉर्मरची गरज भासत आहे का नाही लोकप्रतिनिधी म्हणून जनाची नव्हे तर मनाची तरी बाळगुन चिंचोली माळी गाव विकासापासून वंचित ठेऊ नका असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.

**उपेक्षित लोकांना लढायला**

आवाड यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प अर्पण करून अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या या कार्यक्रमात कर्मवीर एकनाथ आवाड यांच्या नावाने समाजामध्ये विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना स्मृती चिन्ह देऊन पुरस्काराने गौरविण्यात आले.यावेळी डॉ .प्रा.मिलिंद आवाड,दत्ता डाके अशोकराव लगड ड. नारायण गोले उमेश मोगरेकर सत्यभामा सौंदरमल दादासाहेब मुंडे यांच्यासह मानवी हक्क अभियान चे विविध जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष पदाधिकारी यांनी आपल्या भावना व्यक्त करत आवाडांना आदरांजली अर्पण केली या कार्यक्रमास महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक राजेश क्षीरसागर यांनी केले तर सूत्रसंचालन आणि आभार बाबासाहेब थोरात यांनी केले.

**अवकाळी पावसामुळे**

कांदा आणि काढणीच्या प्रतीक्षेत असलेला उभा कांदा खराब झाला त्यामुळे पोथरा येथील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे व पोथरा येथील शेतकऱ्यांच्या कांद्याचा पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी पोथरा येथील शेतकरी करत आहेत.

**कृषिमित्र गजेंद्र बडेंना**

मंत्रालय विशेष प्रतिनिधी, दैनिक पुढारीच्या पुणे आवृत्तीत बातमीदार, उपसंपादक आणि दैनिक सकाळमध्ये बातमीदार व प्रिन्सिपल करस्पाँडंट या पदांवर काम केलेले आहे. बडे यांची आतापर्यंत चार पुस्तके प्रकाशित झाली आहेत. यापैकी एका पुस्तकाला राज्य सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय तर, एका पुस्तकाला महाराष्ट्र साहित्य परिषदेचा उत्कृष्ट ग्रंथ निर्मिती पुरस्कार मिळालेला आहे. याशिवाय पुण्याच्या पत्रकारितेत मानाचा समजल्या जाणाऱ्या पत्रकार वरुणराज भिडे आश्वासक पत्रकारिता पुरस्कारासह केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांचे मिळून १३ पुरस्कार मिळालेले आहेत. याआधी गजेंद्र बडे यांना कृषी क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल के. शंकरनारायणन यांनी कृषिमित्र या पदवीने गौरविलेले आहे. याशिवाय बडे हे देशातील पहिल्या पत्रकार मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले आहेत.

**पंचायत समितीवर आंदोलनाची**

उदासीनतेला कंटाळून मुक्ताराम गवळी यांनी ईशारा दिला आहे  २८ मे रोजी गवळी हे पंचायत समिती परळीच्या कार्यालयात गाय, बैल, म्हैस, कुत्रे, मांजर यांसह विविध प्राणी सोडून आवाजाच्या वाद्यांसह आंदोलन करणार आहेत गवळी म्हणतात, अधिकारी झोपले आहेत, तेव्हा आम्ही त्यांना जागं करणार. दलितांच्या हक्कांवर जो अन्याय होतोय, तो सहन केला जाणार नाही.या पार्श्वभूमीवर पंचायत समिती परळी वै. यांनी आता तातडीने संबंधित उपअभियंत्यांकडून चौकशी करून अहवाल मागविला आहे. मात्र, आंदोलनाची तारीख अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपल्याने प्रशासनाची चाचपणी सुरू झाली आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई–मेल–beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# भारताची गरुडझेप

भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि ही मोदी सरकारच्या आणि देशाच्या १४० कोटी भारतीयांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. भारत पूर्वी हत्ती आणि सापांचा देश म्हणून ओळखला जात असे. आता त्याचे रूपांतर एका विकसित नव्हे पण विकासाच्या मार्गावर असलेल्या चौथ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेत होत आहे ही आपल्या सर्वांसाठी निश्चितच आनंदाची आणि मुजरा करण्यायोग्य बाब आहे. नीती आयोगाचे सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी ही माहिती नुकतीच दिली आणि भारतापुढे आता चीन, अमेरिका आणि जर्मनी हेच तीन देश आहेत अशीही त्यांनी माहिती दिली आणि ही माहिती केवळ भारतीयाने दिली नाही तर भारतद्वेष्ट्या अशा आयएमएफने दिली आहे. त्यामुळे ही आकडेवारी विश्वसनीय आहे. कारण तेथे तर कुणी मोदी भक्त नाही तर उलट मोदींचा आणि भारताचा द्वेषच करणारे आहेत. भारत आता जपानला मागे टाकून चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे हे निःसंशय गौरवास्पद आहे. हे श्रेय जसे मोदी यांचे आहे तसेच ते १४० कोटी भारतीयांचे आहे, या देशातील प्रत्येक नागरिकाचे आहे.

भारत आता जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि त्याला कारण ठरली आहे ती, भारतातील भू राजकीय स्थिती आणि अत्यंत अनुकूल आर्थिक वातावरण. ४ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था आज भारताची आहे आणि हे स्थित्यंतर जबरदस्त आहे, तसेच ते देशाची कहाणी सांगणारी आहे. आयएमएफच्या आकडेवारीनुसार भारत आज जपानपेक्षा मोठा आहे आणि भारताच्या पुढे आज फक्त जर्मनी, अमेरिका आणि चीन आहेत. पण हे यश भारताला सहजसाध्य मिळालेले नाही. अर्थव्यवस्थेचा आकार मोजला जातो तो जीडीपीच्या माध्यमातून आणि तोच जपानपेक्षा काहीसा जास्त आहे. आयएमएफच्या अहवालात म्हटले होते की, विकासाचा आऊटलुक २०२५ मध्ये ६.२ टक्के होता. त्याला खासगी सहभाग आणि उपभोगाने विशेषतः ग्रामीण भागात चांगल्या मागणीचा हातभार लागला आहे. त्याशिवाय भारताचे बाजारपेठीय पोटेन्शियल आणि व्यापक होत चाललेले आर्थिक क्षेत्र, वाढते जागतिक व्यापार आणि गुंतवणूक फ्लोमध्ये सहभाग यामुळे भारताची अर्थव्यवस्था आज या मुक्कामाला पोहोचली आहे.

पंतप्रधान मोदी यांनी २०१४ मध्ये सत्ता हस्तगत केली. तेव्हापासून भाजपाच सत्तेत आहे आणि त्या काळापासूनच देशाची प्रगती अखंड आणि अविरत सुरू आहे. काँग्रेसच्या काळात गुंतवणूकदारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील विश्वास उडाला होता आणि भ्रष्टाराच्या अनेक प्रकरणामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास कमजोर झाला होता. पण मोदी सत्तेवर आल्यावर त्यानी 'न खाने दूंगा ना खाऊंगा...' अशी घोषणा दिली आणि त्यानुसार एकही भ्रष्टाचाराची तक्रार नोंदवण्यात आलेली नाही. अन्यथा काँग्रेसच्या काळात भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे चर्चेत होती आणि रोज वृत्तपत्रांना नवीन मसाला पुरवला जात होता. पण आज ती परिस्थिती राहिलेली नाही. हा गुणात्मक बदल मोदी आल्यापासून झाला आहे. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास परत आला आहे आणि त्यामुळे भारत आज चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे. पण हे काम सोपे नव्हते. त्यासाठी मोदी यांची विलक्षण जिद्द आणि निर्धार तसेच तमाम भारतीयांची मोदी यांना मिळालेली साथ ही कारणे होती. केवळ आर्थिक विकासाच्या आकडेवारीवर विचार केला तरी मोदी सरकारची कामगिरी या दहा वर्षांत प्रभावी राहिली आहे. अर्थात मोदी यांची ही कामगिरी असामान्य असली तरीही पुरेशी प्रशंसा करण्यालायक मात्र नाही हे कबूल करणे भाग आहे. जरी मोदी सरकारची आर्थिक कामगिरी जबरदस्त असली तरीही कोट्यवधी भारतीय गरीबच आहेत. तसेच नोकऱ्यांचे भयावह वास्तव आहे. त्यामुळे तरुणांना रोजगाराचा लाभ होत नाही तोपर्यंत भारत सुखी आहे असे म्हणवत नाही.

अर्थव्यवस्था जरी समाधानकारक असली तरीही काही बॉटलनेक्स आहेत. त्यात सर्वप्रथम आहे तो गरिबीचा. गरिबी आणि असमानतेचे अंदाज याबाबतचे वास्तविक चित्र समोर येत नाही. मोदी यांनी रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारण्यावर जोर दिला आहे आणि त्यामुळे आपल्याला देशात आज अनेक ठिकाणी चांगले रस्ते आणि पूल तसेच सेतू बांधलेले दिसून येतात. पण त्याबरोबरच डिजिटल प्रणालीचा वापर व्हावा तितक्या प्रमाणात वाढलेला दिसत नाही, यावर मोदींनी विचार केला पाहिजे. कारण चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणायचे आणि व्यवहार तसेच पूर्वीच्या पद्धतीने करत राहायचे हे चांगले नाही. कोणत्याही देशाला ते शोभण्यासारखे नाही. मोदी यांनी शौचालये बांधण्याच्या योजना आणल्या आणि देश हागणदारी मुक्त केला. पण अजूनही ग्रामीण भागात काही ठिकाणी ही स्थिती आहेच आणि शेवटी अमर्त्य सेन यांनी म्हटल्याप्रमाणे शेवटच्या पायरीवर उभ्या असलेल्या माणसाला जोपर्यंत विकासाची फळे मिळणार नाहीत तोपर्यंत त्या विकासाची फळे शेवटपर्यंत पोहोचली असे म्हणता येणार नाहीत. त्याबाबतीत मोदी यांना अजून बरेच कार्य करायचे आहे. पण मोदी हे कार्य करून दाखवतील यात अजिबात शंका नाही. भारताच्या विकासाने झेप घेतली आहे पण महामारीचा काळ आणि त्यादरम्यान झालेले धान्य वितरण वेगाने झाले. ही निःसंशय स्पृहणीय बाब होती, पण त्याच काळात सरकारच्या अन्न बिलात पाच पट वाढ झाली.

मोदींच्या या यशात इतरही काही क्षेत्रांचा वाटा आहे. ती क्षेत्रे म्हटली तर विजेचे प्रमाण आणि तिचा वाढता वापर तसेच डीबीटीच्या माध्यमातून गरिबांना रोख रकमेचे हस्तांतरण करण्यात येत असल्यामुळे त्यातील भ्रष्टाचारच कमी झाला हेही मोदी यांच्या कार्याचे यशच म्हणावे लागेल... मोदी सरकारने भारताची अर्थव्यवस्था आज वाढवली आहे इतकी ती चौथ्या क्रमांकाची बनवली आहे. पण अजूनही भारतातील अकुशल आणि गरीब वर्ग मोठ्या प्रमाणात बेरोजगार आहे आणि त्याच्यासाठी मोदी सरकार नोकऱ्या उपलब्ध करू शकलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. अजूनही भारतातील बहुसंख्य वर्ग शेतीवरच अवलंबून आहे. ही आव्हाने आहेतच पण मोदी यांचे यश निश्चित अभूतपूर्व आहे.

# सर्वोच्च न्यायालयाने दिले ग्राहक चळवळीला बळ

## ग्राहक विशेष




ग्राहक चळवळीचे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरण क्षेत्रातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करत ग्राहक न्यायालयांच्या रचनेसह त्यांच्या कार्यप्रणालीत केंद्र सरकारने काही महत्त्वाचे फेरबदल तातडीने न केल्यास ग्राहक न्यायालयांची सध्याची रचनाच कोसळू शकते असा गंभीर इशारा सर्वोच्च न्यायालयाच्या न्या. सुंदरेश आणि न्या. अभय ओक यांच्या खंडपीठाने नुकताच दिला आहे. याबाबत येत्या तीन महिन्यांत केंद्र सरकारची भूमिका प्रतिज्ञापत्रावर सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या ९२ पानी निकाल पत्रातील पहिली २७ पाने ग्राहक चळवळीतील प्रत्येक कार्यकर्त्याने वाचलीच पाहिजेत, अशी आहेत.

"Man is what he consumes" अशी सुरुवात करत या २७ पानांत न्यायमूर्तीद्वयाने ग्राहक चळवळीच्या विखुरलेल्या बीजांचा शोध घेतला आहे. महात्मा गांधींचा मिठाचा सत्याग्रह, दांडी यात्रा, सविनय कायदेभंग आणि भारतीय स्वातंत्र्याची चळवळ हे त्यापैकीच एक आहे. इंग्रज व्यापाऱ्यांच्या मक्तेदारी विरुद्धचा राग व्यक्त करण्यासाठी त्यांचा आयात केला जाणारा संपूर्ण चहा समुद्रात फेकून साजरी केली गेलेली 'बोस्टन टी पार्टी' ज्यातून घडून आलेली अमेरिकन राज्यक्रांती आणि फ्रान्समध्ये पावाच्या तुटवड्यावरून झालेले दंगे आणि त्यानंतर घडून आलेली फ्रेंच राज्यक्रांती... थोडक्यात, ग्राहकांच्या मीठ, चहा, पाव यांसारख्या अगदी प्राथमिक गरजा भागवणाऱ्या वस्तुंसाठी सुद्धा किती मोठे लढे पूर्वी लढवले गेले आणि त्यातून राजकीय क्रांत्या घडल्या आणि स्वातंत्र्य लढे लढवले गेले हे दाखवणारा वेगळाच दृष्टिकोन या ऐतिहासिक सहलीत इथे पहायला मिळतो. तसेच अगदी प्राचीन काळापासून भारतात व्यापाऱ्यांच्या अनुचित आणि फसव्या प्रथांना आळा घालण्यासाठी ठरवून दिलेली मानके आणि त्याचे उल्लंघन झाल्यास राजांकडून दिली जाणारी दंडात्मक शिक्षा यांचाही आवर्जून उल्लेख इथे आढळतो. हे निकालपत्र नंतर भारतीय घटना समितीतील डॉ. आंबेडकरांच्या त्या ऐतिहासिक भाषणाचा काही अंश उदधृत करते. डॉ. आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव यावर दिलेला भर ग्राहकांच्या दृष्टिकोनातून कसा महत्त्वाचा आहे, हे सुद्धा या निकालपत्रात न्यायमूर्तीद्वयाने सुंदर पद्धतीने विषद केलं आहे. त्यानंतर भारतीय घटनेतील मूलभूत हक्क आणि राज्यांसाठी असलेली मार्गदर्शक तत्त्वे यांचा आढावा घेत घटनेतील कलम ४७ द्वारे नागरिकांचे म्हणजेच पर्यायाने ग्राहकांचे पोषण (Nutrition), जीवनमानाचा दर्जा उंचावणे आणि सार्वजनिक स्वास्थ्य (Public Health) याबद्दल भारतातील सर्व राज्यांची घटनादत्त कर्तव्ये याची आठवणही हे निकालपत्र आपल्याला आवर्जून करून देते.

यात पुढे असेही नमूद केले आहे की, ग्राहकतावाद हा भारतीय संविधानाचा आत्मा आहे. हे केवळ ग्राहकांचे व्यापारी वा सेवा पुरवठादारांविरुद्ध अधिकार ओळखण्यापुरते मर्यादित नसून, त्याहीपलीकडे जाते. ग्राहकांचे अधिकार हे केवळ घटनादत्त (Constitutional) किंवा कायदेशीर ( Statutory) हमीपुरते मर्यादित नाहीत, ते अधिकार हे नैसर्गिक असून म्हणूनच ते कोणालाही हिरावून घेता येत नाही. "They are natural therefore inalignable." किती उत्तम विवेचन आणि मांडणी! म्हणजे आता भारतीय घटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत हक्कांच्याही वरच्या पायरीवर ग्राहकांचे हे मूलभूत नैसर्गिक अधिकार सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाद्वारे नेऊन ठेवले आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. ग्राहक चळवळीतल्या प्रत्येक कार्यकर्त्याने याची नोंद घेणे आवश्यक आहे. अशा उंचीवर ग्राहक अधिकारांना घेऊन जात या निकालपत्रात एकामागोमाग एक ग्राहक संरक्षण कायद्याच्या कक्षा रुंदावणाऱ्या आणि ग्राहकांप्रति अत्यंत उदारमतवादी अशा अनेक पथदर्शी निर्णयांची पखरणच हे निकालपत्र करते.



अ‍ॅड. शिरीष वा. देशपांडे

कार्याध्यक्ष, मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहकतावादाची इतकी सुरेख आणि आकर्षक संवैधानिक मांडणी करतानाच या निकालपत्रात पुढे ग्राहकतावाद आणि सार्वजनिक हित, सामाजिक न्याय, राजकारण, अर्थकारण आणि पर्यावरण यांचे अन्योन्य संबंध यावर केलेले भाष्य सुद्धा ग्राहक कार्यकर्त्यांनी वाचून आणि समजून घेतले पाहिजे. हरित ग्राहकतावादाचे (Green Consumerism) महत्त्व आणि त्यातील तरुणाईचा संभाव्य सहभाग सुद्धा हे निकालपत्र आवर्जून अधोरेखित करते आणि अशा या ग्राहकतावादातील कळीचा मुद्दा म्हणजे ग्राहक तक्रार निवारण! आणि आजच्या घडीला ते पुरेसे आहे का हा खरा प्रश्न या निकालपत्रात उपस्थित केला गेला आहे. ग्राहकांना न्याय ( Consumer Justice) हा सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि पर्यावरणपोषक अभिप्रेत आहे. ग्राहकतावाद हा भविष्यात आणखी विविध अंगांनी विकसित होणारा असल्याने ग्राहक आयोगांनी भारतीय घटनेतील वर उल्लेखिलेल्या ग्राहकाभिमुख तरतुदींची बूज राखणे हे आवश्यक आहे असेही हे निकालपत्र सर्वांना आठवण करून देत आता प्रचलित ग्राहक तक्रार निवारण व्यवस्थेमध्ये तातडीने काही महत्त्वाचे बदल करणे जरुरीचे असल्याचे अधोरेखित करते. राज्यकर्त्यांनी हे तातडीचे बदल करण्याची सजगता दाखवली नाही तर ही सर्व तक्रार निवारण यंत्रणाच कोसळू शकते असा धोक्याचा इशारा केंद्र सरकारला दिला आहे. इतकंच नव्हे तर कायमस्वरूपी 'ग्राहक ट्रायब्युनल्स' किंवा 'ग्राहक न्यायालये' स्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारने आपली भूमिका येत्या तीन महिन्यांत सर्वोच्च न्यायालयापुढे स्पष्ट करावी असाही आदेश सर्वोच्च न्यायालयाने या महत्त्वपूर्ण निर्णयात दिला आहे.

हा जो आदेश आहे याचा आणि पहिल्या २७ पानांतील विवेचनाचा साधकबाधक विचार सर्व ग्राहक संस्थांनी एकत्रित बसून करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या ज्या अनेक निर्णयांचा उल्लेख या निकालपत्रात केला आहे त्यात प्रामुख्याने अधोरेखित केली गेलेली गोष्ट म्हणजे "These are quasi-judicial tribunals brought into existence to render inexpensive and speedy remedies to consumers. The idea was to provide inexpensive and speedy resolution of consumer disputes." म्हणजेच (हे न्यायाधीकरण ग्राहकांना स्वस्त आणि जलद उपाय प्रदान करण्यासाठी अस्तित्वात आणले आहे.) आज प्रत्यक्षात ग्राहक आयोगांत काय परिस्थिती आहे हे सर्वच ग्राहक संस्था जाणतात. त्यामुळे आता हीच ती वेळ आहे सर्व ग्राहक संस्थांनी संघटितपणे हा प्रश्न केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्रालयाबरोबर लावून धरण्याची आणि ग्राहक आयोगांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल करून घेण्याची. सुदैवाने सर्वोच्च न्यायालयानेच ही संधी आपल्या सर्वांना दिली आहे. आम्ही त्यांचे सोने करणार का हाच खरा प्रश्न आहे. या ऐतिहासिक आणि अत्यंत ग्राहकाभिमुख निकालपत्राबद्दल न्या. सुंदरेश आणि न्या. अभय ओक यांचे मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे आणि समस्त ग्राहकांतर्फे मनापासून आभार.

# फादर ऑफ इस्लामिक बॉम्ब!

१९७४ साली भारताने अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर पाकिस्तानला स्वतःच्या सुरक्षिततेविषयी चिंता वाटू लागली. त्यानंतर पाकिस्तान त्या बाबतीत स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पाकिस्तानचे त्यादृष्टीने गुप्तपणे प्रयत्न सुरूच होते. ज्या देशाशी (भारताशी) पाकिस्तानने तीन युद्धे लढली होती, त्या देशाकडे अणुबॉम्ब असणे ही गोष्ट पाकिस्तानची झोप उडवणारी होती.

पाकिस्तानची अमेरिकेबरोबर घट्ट मैत्री असली तरी त्यांच्याकडून मिळणाऱ्या संरक्षणावर संपूर्णपणे अवलंबून राहणे योग्य नव्हते. त्यातच ११ आणि १३ मे १९९८ रोजी भारताने पुन्हा एकदा आपली अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडल्यानंतर, पाकिस्तान स्वस्थ बसणे शक्यच नव्हते. पाकिस्तानने त्यानंतर १५ दिवसांनी म्हणजे २८ आणि ३० मे रोजी आपली पहिली अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडली आणि संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का दिला. अशाप्रकारे अणुचाचणी यशस्वीपणे पार पाडणारा पाकिस्तान हा जगातील पहिला मुस्लीम देश ठरला.

पाकिस्तानच्या अणुबॉम्बचे जनक होते, डॉ. अब्दुल कादीर खान. ए. क्यू. खान या नावाने पाकिस्तानमध्ये सुप्रसिद्ध असलेले अब्दुल कादीर खान हे एका रात्रीत पाकिस्तानी जनतेचे हिरो बनले. 'फादर ऑफ इस्लामिक बॉम्ब' या उपाधीने ते जगभर ओळखले जाऊ लागले.

डॉ. अब्दुल कादीर खान यांचा जन्म १९३६ साली भारतातील भोपाळ (मध्य प्रदेश) येथे झाला होता. डॉ. खान यांचे वडील अब्दुल गफूर खान हे ब्रिटिश सरकारच्या शिक्षण मंत्रालयात एक अधिकारी म्हणून काम करत होते. १९४७ साली जेव्हा भारताची फाळणी झाली तेव्हा डॉ. खान यांचे कुटुंब पाकिस्तानमधील कराची या ठिकाणी स्थलांतरित झाले. डॉ. खान यांचे सुरुवातीचे शिक्षण लाहोर येथे झाले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी त्यांनी कराची येथील एका कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर डॉ. खान यांनी कराची मेट्रोपॉलिटन कॉर्पोरेशनमध्ये नोकरी पत्करली.



अभय गोखले

ज्येष्ठ विश्लेषक

१९६१ साली मेटॅलर्जिकल इंजिनीअरिंगचा अभ्यास करण्यासाठी डॉ. खान यांनी टेक्निकल युनिव्हर्सिटी बर्लिन येथे प्रवेश घेतला. १९७२ साली डॉ. खान, ॲमस्टर्डम येथील फीजिक्स डायनामिक्स रिसर्च लॅबोरेटरीमध्ये सीनियर स्टाफ म्हणून रूजू झाले.ते फिजिक्स लॅबोरेटरीमध्ये काम करत असताना, युरेन्को ग्रुपने त्यांना सीनियर सायंटिफिक स्टाफमध्ये जॉईन होण्याची ऑफर दिली. ती ऑफर डॉ. खान यांनी आनंदाने स्वीकारली. युरेन्को ग्रुपमध्ये डॉ. खान यांच्याकडे सोपविण्यात आलेली जबाबदारी त्यांनी समर्थपणे पार पाडली.



त्याच सुमारास म्हणजे जानेवारी १९७२ मध्ये पाकिस्तानने 'ॲटोमिक बॉम्ब प्रोजेक्ट' सुरू करण्याचा गुप्तपणे निर्णय घेतला होता. पाकिस्तानचे तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांच्या अध्यक्षतेखाली मुलतान येथे काही शास्त्रज्ञांबरोबर झालेल्या गुप्त बैठकीतवरील निर्णय घेण्यात आला होता. ॲटोमिक बॉम्ब प्रोजेक्ट हा भुत्तो यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली, तसेच पाकिस्तान ॲटोमिक एनर्जी कमिशनचे अध्यक्ष मुनीर अहमद खान यांच्या नियंत्रणाखाली राहणार होता. मुनीर अहमद खान यांनी ' प्रोजेक्ट - ७०६' या सांकेतिक नावाखाली युरेनियम एनरिचमेंट प्रोग्रॅमला सुरुवात केली होती. त्यावेळी ए.क्यू.खान हे नेदरलँडमध्ये युरेनियम एनरिचमेंट फॅसिलिटीत काम करत होते. १९७५ साली त्यांनी पाकिस्तान सरकारसाठी काम करण्याची आपली इच्छा प्रकट केली. पाकिस्तान सरकारने त्यांना पाकिस्तानमध्ये परतण्याची विनंती केली. त्यांनी पाकिस्तानमध्ये परतताना आपल्या बरोबर सेंट्रिफ्युजची ड्रॉइंग्ज आणली होती.

त्यानंतर पाकिस्तानने खान यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या न्युक्लियर एनरिचमेंट फॅसिलिटीमध्ये ती सेंट्रिफ्युजेस ॲसेंबल केली. त्यानंतर युरोपमधील काही विकसित देशांकडून पाकिस्तानने अणुविषयक सामग्री आणि तंत्रज्ञान भूमिगत नेटवर्कच्याद्वारे प्राप्त केले. पाकिस्तानने आपला अणुविषयक कार्यक्रम अतिशय गुप्त राखला होता.

१९७० च्या दशकात अणुविषयक कार्यक्रम तत्कालीन पंतप्रधान झुल्फिकार अली भुत्तो यांच्या देखरेखीखाली होता.झुल्फिकार अली भुत्तो हे या बाबतीत ए. क्यू. खान यांच्याशी थेट संपर्क राखून होते. ए. क्यू खान जितका मागतील तितका निधी त्यांना पुरवण्यात येत होता. त्याचे कोणतेही ऑडिट ठेवण्यात आले नव्हते. या कार्यक्रमाची सुरक्षा ए. क्यू. खान यांच्यावर सोपवण्यात आली होती.

त्यानंतर झिया उल हक यांनी जेव्हा पाकिस्तानची सत्ता ताब्यात घेतली तेव्हा त्यांनीही ए. क्यू खान यांच्याशी थेट संपर्क ठेवला होता. १९८८ साली विमान अपघातात झिया यांचा मृत्यू झाल्यानंतर पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष गुलाम इशाक खान यांनी ती जबाबदारी लष्करप्रमुखांकडे सोपवली. त्यानंतर ए. क्यू. खान यांच्याशी थेट संपर्क साधण्याचे काम लष्करप्रमुख पाहू लागले.

## राशिभविष्य

मंगळवार, २७ मे २०२५

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख अमावस्या ०८.३४ पर्यंत. नंतर ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदा शके १९४७, चंद्र नक्षत्र रोहिणी, योग सुकर्मा, चंद्र राशी वृषभ. भारतीय सौर ६ ज्येष्ठ शके १९४७ म्हणजेच मंगळवार, दिनांक २७ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.०० मुंबईचा सूर्यास्त ०७.१०, मुंबईचा चंद्रोदय नाही, मुंबईचा चंद्रास्त ०७.४०, राहू काळ ०३.५३ ते ०५.३१, वैशाख अमावस्या, करिदिन, ज्येष्ठ मासारंभ, सकाळी ०८.३२ नंतर, गंगा दशहरा प्रारंभ. अमावास्या समाप्ती, सकाळी ०८.३२.

### ॥ भविष्य ॥

**मेष** : आर्थिक स्थिती उत्तम राहील.

**वृषभ** : समाधानकारक दिवस राहील.

**मिथुन** : सर्व कामांमध्ये यश मिळेल.

**कर्क** : कामे काळजीपूर्वक करावीत.

**सिंह** : मान्यवर व्यक्तींच्या गाठीभेटी होतील.

**कन्या** : नोकरीत अनुकूल वातावरण राहील.

**तूळ** : भाग्य साथ देईल.

**वृश्चिक** : आर्थिक लाभ होतील.

**धनू** : अचानक धनलाभ.

**मकर** : झेपतील एवढीच कामे घ्या.

**कुंभ** : प्रगतीला पोषक ग्रहमान आहे.

**मीन** : आर्थिक बाजू चांगली राहील.

## जनसंवाद

### गांभीर्य लक्षात घ्यावे लागेल

भारतीय सुरक्षा यंत्रणेने पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली एका यूट्यूबरसह १२ जणांना पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातून अटक करण्यात आली आहे. हे सगळे उत्तर भारतात सक्रिय असलेल्या एका शेजारील देशाशी जोडलेल्या हेरगिरी नेटवर्कचा भाग होते. भारत-पाकिस्तान यांच्या युद्धाच्या वेळेला लष्कराची माहिती शत्रू राष्ट्राला मिळते हे किती गंभीर आहे. देशातील संवेदनशील माहिती पाकिस्तानला या हेरांमार्फत मिळत आहे. यातील एक मोहम्मद तारिफ, भारतीय सैन्याच्या हालचालींशी संबंधित गोपनीय माहिती दिल्लीतील पाकिस्तान उच्चायोगात कार्यरत असलेल्या दोन कर्मचाऱ्यांना पुरवत होता. देशाच्या सुरक्षेसाठी ही गंभीर बाब आहे. या सर्वांना हेरगिरीच्या गुन्ह्याखाली अटक करून मोठी शिक्षा दिल्यास हेरगिरी आवाक्यात येईल. दहशतवाद विरोधी पथकाला देशात पाळत ठेवून असेच हेर शोधून देशाची सुरक्षा सुरक्षित करावी लागेल. हेरगिरी करून देशविरोधी कारवाया करणे हे दहशतवादी कारवायांपेक्षा गंभीर आहे.

– **विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### महाराष्ट्राचे 'मद्यराष्ट्र' होऊ नये...!

वर्षभरात काही कोटी लिटर मद्य रिचविणाऱ्या राज्यातील मद्यप्रेमींमुळे राज्याच्या तिजोरीत २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल २५ हजार ४६७ कोटी रुपये महसूल जमा झाला आहे. गतवर्षी म्हणजे २०२३-२४ मध्ये मद्यविक्रीतून २३ हजार ३२२ कोटी रुपये महसूल झाला होता. म्हणजे यंदा २१४५ कोटी रुपयांची वाढ झाली. मद्यविक्रीतून मिळणारा महसूल हा राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी एक महत्त्वाचा आर्थिक स्रोत आहे. या महसुलामुळे सरकारला विविध विकास योजनांवर खर्च करण्यासाठी निधी उपलब्ध होतो, असे असले तरी एकीकडे दारूचे व्यसन वाईट, दारूच्या व्यसनामुळे अनेक संसार उद्ध्वस्त झाले आहेत, दारूमुळे आरोग्यावर दुष्परिणाम होतात, अशा प्रकारचे समाज प्रबोधन करायचे आणि दुसरीकडे महसूल वाढीसाठी दारूच्या दुकानांची संख्या वाढवायची हे सरकारचे विसंगत धोरण सामान्य जनतेच्या पचनी पडण्यासारखे नाही. आज देशामध्ये बिहार, गुजरात, नागालँड आणि मिझोरम या राज्यात संपूर्ण दारूबंदी आहे. दारूविक्रीतून मिळणाऱ्या महसुलावर त्यांनी पाणी सोडले आहे. या राज्यांनी महसूल उत्पन्न वाढीसाठी इतर कोणते मार्ग शोधले आहेत. अशावेळी मद्यविक्रीतून अधिकाधिक महसूल मिळविण्याच्या प्रयत्नात महाराष्ट्राचे 'मद्यराष्ट्र' होऊ नये हीच अपेक्षा!

– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व)

### सावधान कोरोना येतोय...

पाच वर्षांपूर्वी जगभरात कोनोना प्रादुर्भाव पसरला त्याचा परिणाम भारतातही झाला. रोगावर नियंत्रण मिळविण्यात दोन वर्षे गेली, तोपर्यंत लाखो लोक मृत्युमुखी पडले. नको त्या आठवणी म्हणण्याची वेळ आली. कोरोना प्रादुर्भाव रोखण्यातील महत्त्वाचे नियम म्हणजे साखळी तोडणे, मुखपट्टी बांधणे, हाताला सॅनिटायझर लावणे, स्पर्श टाळणे इत्यादी मागील पाच वर्षांत जे अनुभवले तेच आता पुन्हा अनुभवायचे आहे. जर कोरोनाची लागण झाली तर औषधोपचार किती महागडा आहे याचा अनुभव आलेला आहे, म्हणून प्रत्येक नागरिकाने स्वतःची काळजी स्वतःच घ्यायची आहे. मुंबई, महाराष्ट्रासह दिल्ली, केरळ, तामिळनाडू कर्नाटक राज्यात नवीन रुग्ण आढळून आले आहेत. मुंबईत १८३, ठाणे १०, महाराष्ट्रात २१० रुग्ण आढळले आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे काही नवीन तंत्रज्ञान अवगत झाले. मोबाईल तंत्रज्ञानाने क्रांती केली. मोबाईलवरून अभ्यास, वर्कफ्रॉम होम, थोडक्यात तुमचा दुसऱ्या व्यक्तीशी स्पर्श होऊ नये म्हणून साखळी तोडणे उपाययोजना. हॉटेल, रेस्टॉरंट बंद. सार्वजनिक ठिकाणी कमी वावर, बसमध्ये एका आसनावर एक प्रवासी अशी विविध योजनेतून कोरोना प्रादुर्भाव रोखण्यात आला. आता त्याची पुनरावृत्ती होते आहे. काळजी घ्या. नियम पाळा, कोरोना टाळा.

– **महादेव गोळवसकर,** कुर्ला, मुंबई

### लाडकी बहीण योजनेपुढे बाकी योजना गौण?

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कार्यान्वित राहण्यासाठी महायुती सरकारला बरीच ओढाताण करावी लागत असल्याचे दिसून येत आहे. काही योजनांचे आर्थिक साहाय्य बंद करून तो पैसा या योजनेकडे वळवला गेला असतानाच आता इतर विभागांचा निधीही परस्पर लाडकी बहीण योजनेसाठी वापरण्यात येत आहे. सामाजिक न्याय आणि विशेष साहाय्य विभागाचा ४१० कोटी ३० लाख रुपयांचा निधी महिला आणि बालविकास विभागाला देण्यात आला आहे. तर आदिवासी विकास विभागाचा ३३५ कोटी ७० लाख रुपये महिला आणि बालविकास विभागाकडे वळवण्यात आल्याचे कळते. महाविकास आघाडीत अर्थमंत्री असलेले अजित पवारच महायुती सरकारमध्येही अर्थमंत्री आहेत. त्यामुळे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांना नाराजी व्यक्त करताना अगोदरच्या सरकारचा काळ नक्कीच आठवला असणार. कारण त्यावेळीही अर्थमत्र्यांकडून निधी कमी पुरवला जातो अशी तक्रार शिवसेनेकडून होत होती. आताही तशीच तक्रार होत असेल तर महायुतीत सारे काही आलबेल नक्कीच नाही हेच खरे.

– **दीपक काशिराम गुंडये,** वरळी

### वाचाळवीरांना जनतेच्या न्यायालयात दिले पाहिजे

नुकताच पहलगाम येथे दहशतवाद्याच्या मुद्द्यावर आपल्या भारतीय सैन्यदलाने जीवाची बाजी लावून ऑपरेशन सिंदुर यशस्वी केले त्यामुळे पाकड्यांना चोख प्रत्युत्तर मिळाले असून यामुळे जगाला दाखवून दिले की भारत काय ताकदवर आहे. ही देशासाठी अभिमानाची बाब म्हणावी लागेल, पण हाच प्रश्न घेऊन भारतातील मध्य प्रदेशचे उपमुख्यमंत्री जगदीश देवडा, मध्य प्रदेशचेचं मंत्री विजय शहा, यांनी सुरक्षादलांना उणेपणा आणणारे विधान केले ते कमी की काय म्हणून समाजवादी पक्षाचे राज्यसभा खासदार राम गोपाल यादव यांनीही व्योमिका सिंह व एअर मार्शल ए. के. भारती यांच्याबद्दल गरळ ओकली तर अर्धवट नेटकऱ्यांनी सेनाधिकारी सोफिया कुरेशी, विदेश सचिव विक्रम मिस्त्री तसेच वायुसेना अधिकारी व्योमीका सिंह यांच्याबद्दल अनुचित शब्दप्रयोग केले. त्यामुळे संबंध देशांमध्ये या विरोधात राळ उडाली आहे. जबाबदार व्यक्तींनी आपल्या सैन्य दलाबद्दल वाटेल तसे बोलणे हे शोभते काय, अशा वाचाळवीरांना कोण आवरणार हा खरा प्रश्न निर्माण झाला आहे. आपले सैन्यदल अहोरात्र खडा पहारा देत सीमेवर लढत असतो. देशाची सुरक्षा करतो, त्यामुळे आपण शांत झोप घेऊ शकतो, निर्भयपणे वावरू शकतो. काही राजकीय मंडळी प्रसिद्धीच्या झोतात येण्यासाठी असले शब्दप्रयोग करत असल्याचे अनेकवेळा दिसून आले आहे त्यामुळे ही काही नवीन गोष्ट नाही. पण भारतीय सुरक्षा यंत्रणेवरील अधिकाऱ्यांना अनुचित शब्दप्रयोग करणे ही लाजीरवाणी बाब म्हणावी लागेल. अशा नराधमांना जनतेच्या न्यायालयात दिले पाहिजे तर आणि तरच आळा बसेल !

– **राजू जाधव,** मांगूर, बेळगाव

### झोपी गेले प्रशासन...

महाराष्ट्रात मान्सून यंदा लवकर असल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. त्यामुळे आपल्याकडे पुरेसा वेळ नाहीये. ऐन पावसात दरवर्षीप्रमाणे आपली तारांबळ उडू शकते. प्रशासन याबाबत गंभीर आहे का? त्यांनी मान्सूनपूर्व तयारी केली आहे का? मुंबईसारख्या शहरात पाणी तुंबण्याची परिस्थिती निर्माण होणे लाजिरवाणे आहे. महानगरपालिका प्रशासन वर्षानुवर्ष यावर तोडगा काढू नाही शकत. यावरून त्यांचे अपयश समोर येते; परंतु प्रशासनाच्या या भोंगळ कारभाराचा फटका सामान्य मुंबईकरांना बसतो.

– **उदय वाघवणकर,** जोगेश्वरी



## काव्यकोडी

**एकनाथ आव्हाड**

### डॉक्टर माझा दादा

*आमचा दादा शिकून*
*मोठा डॉक्टर झाला*
*घरातल्यांचा आनंद*
*नाही गगनात मावला*

*आजारी आम्ही पडलो की,*
*दादाच आधी तपासतो*
*चुटकीसरशी आजाराला*
*लगेच ओळखून घेतो*

*तपासताना प्रसन्नपणे*
*जेव्हा तो बोलतो*
*निम्माशिम्मा आजार आमचा*
*क्षणात पळून जातो*

*इंजेक्शन देण्याची तो*
*नाही करत घाई*
*टोचल्याचं जरासुद्धा*
*कळून येत नाही*

*औषध गोळ्यांचा नाही*
*करीत भडिमार*
*व्यायाम, पथ्यपाणी*
*सांगे संतुलित आहार*

*दवाखान्यातही दादाचा*
*नावलौकिक मोठा*
*त्याच्यापुढे आजार अहो,*
*होऊन जातो छोटा*

*'काळजी नका करू',*
*धीर साऱ्यांना देतो*
*दादाकडे येऊन जो तो*
*ठणठणीत बरा होतो*

*रुग्णांवर उपचार दादा*
*वेळच्या वेळी करी*
*माणसं म्हणतात दादा आमचा*
*आहेच डॉक्टर भारी !*

*१) लांब लांब कान*
*डोळे गोल लालसर*
*उड्या मारताना दिसे*
*तो गोंडस, सुंदर*

*कापसासारखे मुलायम*
*आहे त्याचे अंग*
*कोण बरं हा*
*लवकर सांग?*

*२) हात नाही, पाय नाही*
*लांबीने छोटा, मोठा*
*त्याला पाहता सरसरून*
*अंगावर येतो काटा*

*शेतकऱ्यांच्या या मित्राचं*
*एक नाव भुजंग*
*नागमोडी आकारात*
*कोण सरपटतो सांग?*

*३) स्वभावाने भित्रा*
*पळण्यात चपळ*
*शत्रू दिसताच*
*लगेच काढे पळ*

*दिसायला सुंदर*
*जंगलात आढळतो*
*मृग हाक मारताच*
*कोण वळून पाहतो?*

उत्तर -
१) ससा
२) साप
३) हरिण

eknathavhad23 @gmail.com

## चित्र रंगवा बक्षीस जिंका

चित्र रंगवून ई-मेल करा आणि बक्षिसे जिंका चित्रासोबत नाव व पत्ता लिहून पाठवणे.

kilbil@ prahaar.co.in


**चित्र रंगवा आणि बक्षीस मिळवा...**

चित्र रंगवून कात्रण ई-मेल करा अथवा टपालाद्वारे गुरुवारपर्यंत पाठवणे.

स्पर्धकाचे नाव, फोटो शाळेचे नाव व ठिकाण, इयत्ता, घरचा पत्ता आणि संपर्क क्रमांक.

सर्वोकृष्ट चित्र रंगवणाऱ्या विजेत्याला बक्षीस आणि प्रसिद्धी दिली जाईल.

प्रहारचे कर्मचारी आणि त्यांच्या परिवारास स्पर्धेत भाग घेता येणार नाही.





**चित्र रंगवा विजेता :**
**ओम महेश कोठावळे**
**शाळा :** जि. प. पूर्ण प्राथमिक शाळा कसबा वाघोटण, ता- देवगड, जि- सिंधुदुर्ग



**परीक्षक :** मनिषा दिवाकर जाधव
मुख्याध्यापिका
सुषमा पाटील विद्यालय व ज्यु. कॉलेज, कामोठे. नवी मुंबई.



## सूर्य व





**कथा**
**प्रा. देवबा पाटील**

शाळेय जीवनात आदित्य हा अभ्यासात अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचा विद्यार्थी होता. त्याच्या आजोबांना वाचनाची खूप आवड होती. विशेष म्हणजे त्यांना कोडे घालण्यात व सोडविण्यात अतिशय रस होता. एके दिवशी त्यांनी आदित्यला एक कोडे घातले. त्या कोड्यावर आदित्यने खूप विचार केला आणि त्याने त्याच्यापरीने त्या कोड्याचे उत्तर आजोबांना सांगितले. आजोबांना ते पटले; परंतु त्यांनी ते स्वीकारले नाही. रोजच्याप्रमाणे त्या दिवशी शाळेत दुपारच्या मधल्या सुट्टीत पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळील एका निंबाच्या झाडाच्या गार सावलीत आदित्य आणि त्याचे मित्र आपले डबे खाण्यास बसले होते. एवढ्यात एक १४-१५ वर्षांचा मुलगा प्लास्टिकच्या तीन पारदर्शक पिशव्यांमध्ये; एका पिशवीत राजगिऱ्याचे भरपूर लाडू, दुसऱ्या पिशवीत मक्याच्या थोड्याशा लाह्या व तिसऱ्या पिशवीत थोडेसे फुटाणे घेऊन तेथे आला. त्याच्या पोषाखावरून तर तो एक अतिशय गरीब मुलगा दिसत होता. बहुधा तो लाडू, लाह्या व फुटाणे विकणारा असावा.

लाडू, लाह्या व फुटाणे विकण्यासाठी मुला-मुलींच्या प्रत्येक गटाजवळ जाऊनही कोणीही त्याच्याजवळून लाडू विकत घेतले नाही. शेवटी पुन्हा तो आदित्यच्या टोळीजवळच्या एका मोठ्या दगडावर येऊन बसला. त्याने आपल्या पिशवीतून एका फडक्यात बांधलेली आपली न्याहारी काढली. ती फडक्यामध्ये कागदाच्या जाड घडीमध्ये मोडून घडी करून ठेवलेली ती चतकोर कोरडी भाकर होती व त्या भाकरीवर कोरडीच बिनतेलाची थोडीशी लाल मिरच्यांची जाडीभरडी चटणी दिसत होती. तो ती भाकरी खाऊ लागला. तो आदित्यच्या कंपूच्या जवळच बसल्याने आदित्यला ते सारे काही स्पष्टपणे दिसत होते. तसेच त्यालाही या सगळ्यांच्या गप्पा चांगल्या स्पष्ट ऐकू येत होत्या.

आदित्य जेवता जेवता त्याच्या मित्रांना सांगू लागला, "अरे चिंटू, काल किनई आजोबांनी मला एक कोडे सांगितले. मला तर त्याचे उत्तर आले नाही."

"अरे, असे काय कोडे आहे ते! आम्हाला तरी सांग पाहू." चिंटू म्हणाला.

"ते कोडे असे आहे की, सूर्य कोठे जाऊ शकत नाही?" आदित्यने सांगितले.

"साधी गोष्ट आहे. सूर्य कोठेच जाऊ शकत नाही." मोंटूने सांगितले "कारण तो एकाच जागी स्थिर आहे."

" हो ना!" अंतू म्हणाला, "आपली पृथ्वीच तर सूर्याभोवती फिरत असते."

"मित्रांनो, मीसुद्धा आजोबांना हीच उत्तरे दिली होती." आदित्य सांगू लागला; परंतु आजोबा मानतच नाहीत. ते म्हणतात, "तुमची उत्तरे विज्ञानानुसार एकदम बरोबर आहेत. पण मला आणखी वेगळे सकारण योग्य उत्तर हवे आहे आणि तेही उचित स्पष्टीकरणासह."

डबे खाता खाता सगळे मित्र आपापले डोके खाजवायला लागलेत व शेवटी "नाही येत गड्या आपल्याही लक्षात, असे काही वेगळे उत्तर." असे म्हणून आपापले डबा खात राहिले.

"मी सांगू का?" त्या लाडू-लाह्या विकणाऱ्या मुलाने आपली भाकरी खाता खाता विचारले आणि सगळ्यांनी एकदम चमकून त्याच्याकडे पाहिले. आता हा कोणते दिव्य उत्तर सांगणार असे त्यांना वाटले. आधी सर्वांनी त्याची हेटाळणी केली, त्याला फेटाळून लावले; परंतु आदित्य म्हणाला, "तुला येते या कोड्याचे उत्तर?"

"हो. मला माहीत आहे." तो मुलगा म्हणाला.

"मग सांग पाहू." आदित्य त्याला म्हणाला तसे सारे कान टवकारून ऐकू लागले.

"अंधार." तो मुलगा म्हणाला.

"सूर्य अंधारात मुळीच जाऊ शकत नाही." तो सांगू लागला, " कारण सूर्य कोठेही जायच्या अगोदरच सूर्याचे प्रकाशकिरणच तेथे पोहोचतात. म्हणून सूर्य अंधाराकडे जायला लागला तर त्याचे अगोदर सूर्यकिरणच तेथे पोहोचतील व त्या किरणांनीच सारा अंधार दूर पळेल व सगळीकडे प्रकाश पसरून उजेड पडेल. अंधारच राहणार नाही म्हणजे सूर्य अंधारात जावूच शकत नाही." सगळ्यांना त्या मुलाचे म्हणणे पटले. त्याच्या हुशारीचे साऱ्यांनी कौतुक केले. शाळेची मधली सुट्टी संपल्यानंतर सारे आपल्या वर्गात गेले. तो मुलगाही शाळेतच पण दुसऱ्या एका वर्गाकडे निघून गेला.

## आनंदला मिळाला धडा !





**कथा**
**रमेश तांबे**

अरे आनंद उठ! किती वाजलेत बघ? आईची हाक कानी येताच आनंदने दोन्ही हाताने आपले कान दाबून धरले आणि तसाच झोपून राहिला. पुढे अर्धा तास तरी तो लोळतच होता. हाका मारून आई कंटाळली होती.

असे रोजच घडत होते. मग शाळेला उशीर झाला म्हणून घाईघाईने सगळ्या गोष्टी आवरायच्या. घरभर पसारा करायचा. पुस्तके, पेन, पेन्सिली, कपडे कुठेही टाकायचा, शाळेचे बूट-मौजे शोधताना तर त्याची रोज धांदल उडायची. आपल्या वस्तू ठरावीक ठिकाणी ठेवल्या पाहिजेत, म्हणजे त्या शोधण्यात आपला वेळ जाणार नाही की साधी गोष्ट त्याला समजत नव्हती. आई, बाबा, आजी घरातले सगळेजण आनंदच्या या वागण्याला फार कंटाळले होते. आनंदने घरात पसारा करून ठेवायचा आणि बाकीच्यांनी तो आवरायचा हे रोजच घडायचे. पण आनंदच्या स्वभावात, वागणुकीत काहीच बदल होत नव्हता.

आनंदला कामाची सवय कशी लावावी याचा विचार आई-बाबा करत बसले होते. अचानक बाबांना एक गोष्ट सुचली. त्यांनी पटकन आनंदच्या आईला काही गोष्टी समजावल्या आणि ते ऑफिसला निघून गेले. पुढचे दोन चार दिवस आनंद नेहमीप्रमाणे घरातला नीटनेटकेपणा बिघडवून आपल्या वह्या, पुस्तके, कपडे इकडे तिकडे फेकून शाळेत जायचा. तो घरी यायचा तेव्हा नेहमीप्रमाणे आईने घर आवरून ठेवलेले त्याला दिसायचे. त्यामुळे आपण काही चूक करतोय असे त्याला अजिबात वाटत नव्हते. मग तो दिवस उजाडला. बाबांनी त्या दिवसाचे काटेकोर नियोजन केले. आई-आजीला विश्वासात घेतले अन् बाबा ऑफिसला निघून गेले. तिकडे आनंद नेहमीप्रमाणे घरभर पसारा करून शाळेत गेला. शाळा सुटण्याच्या वेळेला कुलकर्णी सरांनी आनंदला बोलावून घेतले आणि म्हणाले, "आनंद आम्ही सर्व शिक्षक आज तुझ्या आजीला भेटायला घरी येणार आहोत. आत्ताच तुझ्या आजीची पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाली म्हणून आम्ही त्यांचा सत्कारही करणार आहोत." आनंदला अतिशय आनंद झाला. तो खुशीतच सरांना म्हणाला, "नक्की सर! आमचे घर तुम्हाला आवडेल आणि आजीलाही खूप आनंद होईल." शाळा सुटल्यावर आनंद आपल्या शिक्षकांसह घरी आला.

आनंदने घराची बेल वाजवली. आईने दरवाजा उघडला आणि मोठ्या आनंदाने म्हणाला, "आई आमचे सर्व शिक्षक आले आहेत आजीला भेटायला! त्यांना काहीतरी छान नाष्टा बनव." पण आनंदच्या लक्षात आले, अरेच्चा! आपण सकाळी फेकलेल्या चपला, बूट, मौजे तसेच बाहेर पडले आहेत. "आई हे काय सर आले आहेत ना! मग घर आवर ना पटापट" आनंद जरा घुश्यातच बोलला. पण आई काही न बोलता स्वयंपाक घरात निघून गेली. सर्व शिक्षक घरात शिरले. घराच्या दरवाजात चपलांचा ढीग त्यांनी पाहिला. तो ओलांडून सारे जण आत आले, बसले आणि आनंदचे घर बघू लागले. मग आजी आली. आनंदने आजीला सर्व शिक्षकांची ओळख करून दिली. आईने मुद्दामहून सर्व शिक्षकांना आनंदची खोली दाखवली. खोली बघताच आनंद शरमला. कारण सकाळी टाकून दिलेले कपडे, वह्या-पुस्तके, पेन-पेन्सिली तशाच पडल्या होत्या. आनंद पुढे येऊन त्या पटापट उचलू लागला.

तेवढ्यात कुलकर्णी सर म्हणाले, "अरे आनंद राहू दे. आम्हाला बघू दे तरी तू तुझे घर किती छान ठेवतोस ते!" आता मान खाली घालून उभे राहण्याशिवाय आनंदला पर्याय नव्हता. तेवढ्यात पाटील बाई म्हणाल्या, "आहो आमचा नातू चार वर्षांचाच आहे. पण त्याच्या सर्व वस्तू तो स्वतःच त्याच्या कपाटात ठेवतो. त्याला आपल्या वस्तूंना कुणी हात लावलेलं जराही चालत नाही." पाटीलबाईंचा एक एक शब्द आनंदला भाल्यासारखा टोचून रक्तबंबाळ करीत होता. सर्व शिक्षक कधी एकदा बाहेर जातात असे त्याला झाले होते.

हा प्रसंग घडून आता पंधरा दिवस उलटून गेले आहेत. तेव्हापासून आनंदमध्ये खूपच बदल झाला आहे. वेळेच्या आधी उठून आपली सर्व कामे तो आता स्वतःच पूर्ण करू लागला आहे. सर्व घर नीटनेटके ठेवण्याची जबाबदारी त्याने स्वतःच्या खांद्यावर घेतली आहे. आनंदचे आई-बाबा मात्र आनंदवर खूपच खूश आहेत. जे काम आईला अनेक वर्षे करता येत नव्हते ते बाबांनी चुटकीसरशी सोडवले होते. पण शिक्षकांना घरी बोलवण्याच्या मागे बाबांचा हात होता ही गोष्ट मात्र आनंदला कधीच कळली नाही!

## कुरडई







**प्रतिभारंग**
**प्रा. प्रतिभा सराफ**

आंब्याचा मौसम सुरू झाला. रत्नागिरीवरून खास मागवलेली आंब्याची पेटी उघडली आणि आंब्याच्या सुगंधाने अख्खे घर भरून गेले. आज पहिला रस करायला हरकत नाही, असा विचार मनात आला आणि मुलीला आवाज दिला,

"राणी, मी आज आंब्याचा रस करणार आहे हं." रविवारी सकाळी अर्धवट झोपेत डोळे किलकिले करत राणी म्हणाली,

"हो, पण आई, त्याच्याबरोबर ते गॅपगॅपवालं राउंड राउंड तळलेलं करतेस ना... ते पण कर हं."

"काय गं तुझी भाषा तरी, कमीत कमी मराठी पदार्थांची नावं तरी लक्षात ठेवत जा... त्याला 'कुरडई' म्हणतात. आता कमीत कमी आंब्याच्या मोसमात तरी लक्षात ठेव. नाहीतर पुढच्या वेळेस नाही बनवणार..."

मी चिडून म्हटले. ती पांघरूण बाजूला करून उठली आणि म्हणाली, "तुझं पण मराठी बरोबर नाही... 'बनवणार नाही' नाही काय, 'तळणार नाही' म्हण."

आणि हसू लागली.

तिच्याशी गप्पा मारता मारता 'कुरडई बनवणे' म्हणजे काय ते आठवत गेले. लहानपणी उन्हाळ्याच्या सुट्टीत 'कुरडई बनवणे' हा फार मोठा उद्योग असायचा मुख्यत्वे माझ्या आईसाठी. चांगल्या प्रतीचे गहू आणणे, ते निवडणे त्यानंतर चार दिवस पाणी बदलत भिजवून ठेवणे. हे भिजलेले गहू वाटण्याचे एक यंत्र आमच्याकडे होते. ते लोखंडी यंत्र स्टूलच्या एका टोकाला स्क्रूने पक्के लावून घेऊन मग त्याच्यामध्ये ते भिजवलेले गहू टाकून हाताने दांडा फिरवून दळावे लागायचे, ते खूप मेहनतीचे काम असायचे. दळून झाल्यावर त्यात खूप सारे पाणी मिसळून ते गाळून घ्यावे लागायचे जेणेकरून गव्हाची फोलपटं चाळणीत वर राहायची आणि गव्हाचे ओले पीठ आणि पाणी खाली पडायचे. ते पाणी तसेच न हलवता अजून एक दिवस ठेवले की गव्हाचे ओले घट्ट पीठ खाली राहायचे आणि वर तरंगून आलेले पाणी फेकून ते ओले पीठ मोठ्या कढईत ठेवून हलवावे लागायचे ही क्रियासुद्धा खूप मेहनतीची होती कारण न थांबता ते हलवावे लागे. ते बऱ्यापैकी घट्ट होत आले की त्यात थोडेसे मीठ टाकून त्याचे गोळे करून सोऱ्याने प्लास्टिक कागदावर किंवा ताटल्यांमध्ये गोल गोल फिरवून सुबक अशा कुरडया घातल्या जायच्या.

राणी हे ऐकून हबकूनच गेली. म्हणाली, " तेव्हा दुकानात मिळत नव्हत्या का गं?"

" नाही गं बाई... नाहीतर कशाला केला असता इतका खटाटोप?"

मग मी तिला आणखी एक दोन गोष्टी सांगितल्या. तेव्हा प्लास्टिक सहज उपलब्ध नव्हते; परंतु दूध प्लास्टिकच्या पिशव्यांमधून यायचे, त्या प्लास्टिकच्या पिशव्या धुऊन, वाळवून आणि मग एकत्रित शिवून एक प्लास्टिकची चादर तयार केली जायची. ते काम सुद्धा खूप वेळखाऊ आणि मेहनतीचे होते. दुसरी गोष्ट म्हणजे या सगळ्या कामात जितकी होईल तितकी आम्हाला आईला मदत करावी लागायची. दिवसभर त्या वाळत घातलेल्या कुरडयांची राखण करावी लागायची."

"बैल राखतात तसे का गं?"

"नाही गं बाई... कुत्रे, मांजरी किंवा एखादा उंदीरही तिथे येऊ शकतो, तोंड लावू शकतो म्हणून त्याच्या बाजूलाच बसावं लागायचं. कधीकधी आमच्या सोसायटीत राहणारी मुलंसुद्धा कुरडया पळवायचे."

"म्हणजे चोरायचे?"

" असं नाही म्हणता येणार; परंतु त्या ते उचलून खायचे."

"कच्चा"?

" हो गं बाई. कच्चाचं. खूप छान लागतात. म्हणजे आमची आई जेव्हा चीक शिजवायची तेव्हा तो गरम गरम चीक आम्हा सगळ्यांना वाटीभरून खायला द्यायची. तो खूप चविष्ट लागायचा... होय आणि तो पौष्टिकही असतो."

"वाव्... साउंड्स गुड. आजी सगळं करायची म्हणजे तुमची किती किती मजा. हे सगळं करणं-पाहणं-खाणं आम्ही मात्र मिस करतो. तू का नाही करत कुरडया घरी?"

"मी बाजारातून आणून तळते हेच खूप झालं गं बाई." म्हणत मी तिथून उठले आणि आंब्याचा रस करायला घेतला.

आपल्यापेक्षा आपली मुले तितकीशी कामसू आणि उत्साही का नसतात याचे कारण कुठेतरी आपणच आहोत का, याचा विचार करू लागले.

कारण गव्हाचा चीक असो, गुळातली जाड्या रव्याची लापशी असो, सांदण, डिंकाचे लाडू, मेथांबा, कडधान्यांचे थालीपीठ इ. पदार्थ आपणच करणे बंद केले आहे. त्यामुळे आपल्या मुलांना या पदार्थांची चव माहीत नाही. त्याच्या फायद्यापासूनही ते मुकले आहेत. यापलीकडे जाऊन मला असे वाटते हे सगळे करण्याचा कौटुंबिक आनंद होता तोही दुरावला आहे.


विचारांच्या तंद्रीत स्वयंपाक झाल्यावर मुलीला आवाज दिला, "राणी या कुरडया जरा तळतेस का?"

"नको गं आई काम सांगूस. आज माझा रविवार आहे ना, आराम करण्याचा दिवस..."

आईचा आराम करण्याचा दिवस कोणता, या विचारात मी गॅसवर कढई चढवली आणि मुलीच्या आवडीच्या कुरडया तळायला घेतल्या.

pratibha.saraph@ gmail.com

## लेखन, वाचन रोज करा





**लहानशा गोष्टी, मोठा अर्थ**
**शिल्पा अष्टमकर**

दिवसभर खेळत राहणे चूक आहे. तसेच सतत आळशासारखे पडून राहणे हे देखील बरोबर नाही. आपण आपली दिनचर्या आखली पाहिजे, त्यासाठी आपण आपले वेळापत्रक तयार केले पाहिजे. दिवसातून किती तास खेळायचे, किती तास अभ्यास करायचा, दूरदर्शनवरील कोणती मालिका पाहायची आणि किती वेळ पाहायचे हे ठरवले पाहिजे. वेळेचे नियोजन केले म्हणजे जीवनात एक शिस्त येते.

**समर्थ रामदास स्वामींचा वाचनावर खूप भर होता.**
**दिसामाजी काही तरी ते लिहावे |**
**प्रसंगी अखंडित वाचीत जावे |**

लेखन आणि वाचन हा विद्यार्थी जीवनाचा आत्मा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेवटपर्यंत अभ्यास करीत होते. एकदा ते दुपारी २ वाजता ग्रंथ वाचायला बसले. त्यांच्याकडे कामाला असलेला नोकर रामचंद सकाळी ९ वाजता येत असे आणि सायंकाळी ५ वाजता जात असे. तो ५ वाजता घरी जायला निघाला तेव्हा बाबासाहेब वाचण्यात गर्क होते. त्याने मी जाऊ का? म्हणून बाबासाहेबांना विचारले, बाबासाहेबांनी हाताने खूण करून त्याला जा म्हणून सांगितले. दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजता रामचंद कामावर आला. बाबासाहेब खुर्चीत बसून पुस्तक वाचत होते. रामचंदला वाटले की बहुतेक रात्री झोपून सकाळी पुन्हा वाचायला बसले असतील. आपण कामावर आलेले आहोत हे सांगण्यासाठी तो फक्त 'बाबासाहेब' म्हणाला तेव्हा काहीशा त्रासिकपणे बाबासाहेब त्याला म्हणाले "तुला जा म्हणून सांगितले ना?'' मुलांनो दुपारी २ ते सकाळी ९ पर्यंत बाबासाहेब अभ्यास करत होते. सारे जग त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतात. रस्त्यावरील दिव्याखाली अभ्यास करून ते बॅरिस्टर झाले. जो वाचेल तो वाचेल, जो वाचणार नाही तो वाचणार नाही हाच नव्या युगाचा धर्म आहे. म्हणून समर्थांनी विद्यार्थ्यांना अफाट वाचन आणि थोडेसे लेखन रोज करायला सांगितले आहे. आपण जे वाचन करतो त्यातील आपल्याला आवडलेला आणि महत्त्वाचा वाटणारा भाग एखाद्या वहीमध्ये लिहून काढावा. निबंध लेखन, पत्रलेखन, कथालेखन करताना अशी टिपणे उपयोगी पडतात.

आजच्या युगात तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे आपले जीवन अधिक सुलभ झाले आहे, पण त्याचवेळी वाचन आणि लेखन या मूलभूत सवयी मागे पडताना दिसत आहेत. त्याचाच परिणाम यंदाच्या १२ वीच्या निकालाच्या टक्केवारीवर दिसून आला. कोरोनात आपल्याला लिहिण्याची सवय पार कमी झाली. कळत नकळत हा परिणाम झाला. या सवयी केवळ विद्यार्थ्यांसाठीच नव्हे, तर प्रत्येक वयोगटातील व्यक्तीसाठी आवश्यक आहेत. कारण आज आपण लिहिणे कमी केले. त्यामुळे स्वतःला सादर करण्यास कमी पडतो. वाचन आणि लेखन या दोन क्रिया माणसाच्या बौद्धिक, मानसिक आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

**वाचनाचे महत्त्व :**

वाचन ही ज्ञान मिळवण्याची पहिली पायरी आहे. चांगल्या पुस्तकांचा सहवास आपल्याला विचारसमृद्ध बनवतो. वाचनाने आपली शब्दसंपत्ती वाढते, भाषेचे सौंदर्य समजते आणि आत्मविश्वासही वाढतो. रोज काही वेळ तरी नित्य वाचन केल्याने मनःशांती मिळते, कल्पकतेला चालना मिळते आणि आपला दृष्टिकोन व्यापक होतो. अभ्यासाच्या पुस्तकांबरोबरच चरित्र, विज्ञान, तत्त्वज्ञान, कथा, कविता अशी विविध प्रकारची पुस्तके वाचणे उपयोगी ठरते.

**लेखनाचे महत्त्व :**

वाचनातून ज्ञान मिळते आणि लेखनातून ते आत्मसात होते. लिहिण्याची सवय मेंदूला कार्यरत ठेवते, विचारांची मांडणी स्पष्ट करते. रोज लेखन केल्याने विचारांची सुस्पष्टता येते, लेखन कौशल्य वाढते आणि भावनांची अभिव्यक्ती सुलभ होते. डायरी लिहिणे, लघुनिबंध, कविता किंवा विचार मांडणे - हे सर्व लेखनाचे प्रकार मनाला शांतता देतात आणि व्यक्तिमत्त्व घडवतात.

वाचन - लेखनाच्या नियमित सवयीसाठी काही मार्गदर्शक टिप्स :

१. नित्य ठरावीक वेळ ठरवा - दररोज कमीतकमी ३० मिनिटे वाचन आणि १५ मिनिटे लेखनाचा सराव ठेवा.

२. विषयांची विविधता ठेवा - फक्त अभ्यासापुरते वाचन न करता विविध विषयांवरील वाचन करा.

३. डायरी किंवा विचार लिहा - दिवसाचे निरीक्षण, अनुभव, प्रेरणादायी विचार रोज लिहा.

४. नवीन शब्दांची यादी ठेवा - वाचनातून सापडलेले नवे शब्द लिहा आणि वापरण्याचा प्रयत्न करा.

५. साहित्यिक चर्चा करा - मित्रांशी वाचनानंतर चर्चा करा, त्यातून समज वाढते.

वाचन आणि लेखन या सवयी आत्मशोधाचा, आत्मविकासाचा आणि यशाचा मार्ग खुला करतात. या दोन सवयींचा रोजचा सराव म्हणजे आत्मा आणि विचारांना पोषण देणारा एक दिव्य योग आहे. त्यामुळे आजपासूनच ठरवा - "रोज वाचा, रोज लिहा - आणि स्वतःला घडवा."

# चार दिवसात तीन वेळा पूल वाहून गेला!

## चर्चा अभियंता भोपळे अन् गुत्तेदार देशमुख सत्कारास पात्र

प्रा.शुभम जैन /कडा

कडा:तालुक्यातील शेरी (बु:) येथील वाहतुकीसाठी तात्पुरता तयार करण्यात आलेला पूल एकाच आठवड्यात दुरुस्त करूनही तिसऱ्यांदा पाण्याखाली गेल्याने वाहतुकीची कोंडी आता प्रवाशांसाठी नित्याचीच झाली आहे 'भोपळे साहेब' आतातरी उघडा डोळे बघा नीट, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

आष्टी तालुक्यातील नगर- बीड मार्गावरील आष्टी ते साबलखेड या महामार्गाचे काम सन: २०२३ एप्रिल पासून सुरु आहे. या सतरा किलोमीटर अंतरावरील रस्त्याचे सोडा पण एकाही पुलाचे काम अडीच वर्षात पूर्ण झालेले नाही. गुत्तेदार आणि महामार्गाचे अधिकारी यांच्यात कसलाच समन्वय नसल्याने हे काम अत्यंत मंद गतीने चालले आहे. या कामावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण मागील वर्षी काम पूर्ण करण्याचा शब्द देण्यात आला होता. मात्र अद्याप हे काम गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांच्या अक्षम्य ढकला- ढकलीमुळे रखडले आहे. मागील काही वर्षांपासून या मार्गावर वाहतुकीची कोंडी आता नित्याचीच झाली आहे. आष्टी तालुक्यातील शेरी बुद्रुक येथे वाहतुकीसाठी

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अभियंता आर व्हि भोपळे आणि या रस्त्याचे काम करणारे कॉन्ट्रॅक्टर देशमुख यांच्या चार दिवसांत तीन वेळा पूल वाहून जाण्याच्या हॅट्रिकची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन त्यांच्या हस्ते या दोघांचा सत्कार व्हायला हवा. अशी उपरोधिक मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश झगडे यांनी केली आहे.

नगर जामखेड रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहन चालकांची आज पुरामुळे मोठी पंचायत झाली. शेरी , केरूळ आणि मांडवा या तिन्ही ठिकाणी पूर आल्याने वाहने अडकून पडली . कडा ते आष्टी हा प्रवास करताना नागरिकांना मोठा द्राविडी प्राणायाम करावा लागला आहे.

तात्पुरता करण्यात आलेला पूल एकाच आठवड्यात दुरुस्ती करूनही तिसऱ्यांदा पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे वाहनधारक मोठ्या प्रमाणात त्रस्त झाले आहेत. भोपळे साहेब आता तरी उघडा डोळे, अन नीट पहा, असाच सवाल त्रस्त नागरिक उपस्थित करत आहेत.





## मंत्री पंकजा मुंडेंनी केले सांत्वन

### ऋणानुबंध:बनसोडे, स्वामी,मुंडे कुटुंबियांचं सांत्वन

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:तालुक्यातील नागापूर येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते स्मृतीशेष गणपत बनसोडे यांचे नुकतेच दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले होते, आज परळी दौर्यात पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या परिवाराची भेट घेतली व सांत्वन करत धीर दिला. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक पद भूषविलेले गणपत बनसोडे हे भाजपचे निष्ठावंत व सच्चे कार्यकर्ते होते. जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून देखील त्यांनी जवाबदारी निभावली होती. एक मनमिळावू, अनुभवी व सर्वांच्या मदतीला धावून येणारे अशी त्यांची ख्याती होती. आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते असा त्यांचा परिचय सर्वज्ञात होता. एक मनमिळावू व धडाडीचा कार्यकर्ता काळाने हिरावून घेतला, त्यांची उणीव भासत राहील अशी भावना पंकजाताई यांनी व्यक्त केली.तसेच नागापूर येथील शिवदास स्वामी यांच्या मातोश्री लक्ष्मीबाई स्वामी यांचे काही दिवसांपूर्वी वृद्धापकाळाने निधन झाले होते, पान २ वर

## अवकाळी पावसामुळे नुकसान !

### मागणी:पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी !



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:केज अंबाजोगाई मतदार संघातील पोथरा येथील शेतकऱ्यांचे जोरदार पाऊसामुळे कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.आवकाळी पाऊस वाढला त्यामुळे कांद्याच्या पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. यामुळे कांद्याचा पुरवठा कमी होण्याची शक्यता आहे. परिणामी, कांद्याचे भाव वाढू शकतात. याचा मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला आहे. रब्बी हंगामाच्या शेवटी आलेल्या या पावसामुळे उभ्या कांदा पिकांचे नुकसान झाले आहे. काढणी केलेल्या कांद्याला देखील फटका बसला आहे. शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील काही आठवड्यात बाजारात कांद्याची आवक घटण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्राहकांना जास्त पैसे मोजावे लागू शकतात.शेतकऱ्यांनी लवकर कांदा काढला, त्यांना चांगला भाव मिळाला. मात्र, ज्या शेतकऱ्यांनी एप्रिल किंवा मे महिन्यापर्यंत काढणी थांबवली, त्यांच्या पिकाला उष्णतेचा आणि पावसाचा फटका बसला. अचानक हवामान बदलल्यामुळे शेतात साठवलेला पान २ वर

## चिंचोली माळी विकासापासून वंचित?

### संतप्त:आ.नमिता लोखंडे आम्ही मते दिली नाहीत का?

पुण्यभूमी प्रतिनिधी

केज: अंबाजोगाई मतदार संघाच्या आमदार नमिता लोखंडे यांनी त्यांच्या भुरट्या सासरे बुवाजीचे ऐकत असल्याने चिंचोली माळी गाव आमदारा नमीता लोखंडे यांनी विकासा पासून वंचित ठेवले आहे कारण चिंचोली माळी गावाला लाईटचा प्रश्न गंभीर बनला आहे ट्रन्सफॉर्मरची गरज भासत आहे परंतु अनेक कारणांमुळे आमदारा सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी चिंचोली माळी गावाला येणारा ट्रन्सफॉर्मर आडविला आहे किंवा उपलब्ध होण्यासाठी खोडसाळ पना करुन उपलब्ध होऊ देत नाहीत तसेच आजु बाजुच्या गावाला अनेक ट्रन्सफॉर्मर उपलब्ध करून दिले एका गावाला तर गरज नसताना



तीन ट्रन्सफॉर्मर उपलब्ध करून दिले परंतु चिंचोली माळी गावाला एकही ट्रन्सफॉर्मर उपलब्ध केला नाही तरी आमदारा नमीता लोखंडे तुम्हाला असे वागणे शोभत नाही कारण तुम्ही आमदारा असताना एका भुरट्या सासरे पान २ वर

## उपेक्षित लोकांना लढायला शिकविले

### बाबुराव पोटभरे: कर्मवीर एकनाथराव आवाड पुरस्कार सोहळा



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:मानवी हक्क अभियानचे संस्थापक कर्मवीर ड.एकनाथ आवाड हे उपेक्षित वंचित बहुजन समाजाच्या विकासासाठी आयुष्यभर लढले. उपेक्षित वंचित समाजातील लोकांना बोलायला आणि लढायला त्यांनी शिकवले असल्याचे मत बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे यांनी व्यक्त केले. कर्मवीर ड.एकनाथराव आवाड यांच्या दहाव्या स्मृती दिन कार्यक्रमाच्या निमित्तानं ते बोलत होते.दरम्यान स्मृतिदिनानिमित्त पत्रकार उमेश मोगरेकर,तुकाराम येवले,बाबा देशमाने यांना कर्मवीर एकनाथराव आवाड पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रकाशराव आनंदगावकर होते तर उद्घाटक म्हणून मोहनराव जगताप प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.मिलिंद आव्हाड उपस्थित होते मंचावर दादासाहेब शिरसागर दादासाहेब मुंडे श्रीमती गयाबाई आवाड सत्यभामा सौंदरमल सरपंच दत्तात्रय डाके शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले धम्मानंद साळवे माजी सरपंच अशोकराव लगड संतोष यादव एकनाथ मस्के बाळासाहेब ताकट शरद यादव मोहन जाधव अशोक वाडेकर सर आदी उपस्थित होते. कर्मवीर एकनाथ पान २ वर

## कृषिमित्र गजेंद्र बडेंना पीएचडी

### अभिनंदनिय:गजेंद्र बडेंचे ठरले राज्यातील पहिले संशोधन

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र, कृषिमित्र गजेंद्र प्रभाकर बडे यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यावाचस्पती (पीएच. डी.) ही पदवी जाहीर केली आहे. बडे यांनी 'मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास' या विषयावर संशोधन करुन पुणे विद्यापीठाला शोध प्रबंध सादर केला होता. विद्यापीठाने हा शोध प्रबंध स्विकारला आहे. मराठीतील कृषिविषयक नियतकालिकांचा अभ्यास' या विषयावर राज्यात याआधी एकही संशोधन झालेले नाही. त्यामुळे या विषयावरील बडे यांचे हे संशोधन राज्यातील एकमेव संशोधन ठरले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर येथील मराठी संशोधन केंद्रात हे संशोधन करण्यात आले. पुणे जिल्ह्यातील तळेगाव ढमढेरे (ता. शिरुर) येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. संदीप सांगळे यांच्या मार्गदर्शनाखाली गजेंद्र बडे यांनी हे संशोधन पूर्ण केले. पीएच. डी. ही विद्यापीठाची सर्वोच्च पदवी जाहीर झाल्याबद्दल अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. जे. बार्नबस आणि अहमदनगर महाविद्यालयातील मराठी संशोधन केंद्राचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर शेलार यांनी गजेंद्र बडे यांचे अभिनंदन केले आहे. गजेंद्र बडे हे मूळचे बीड जिल्ह्यातील दुकडेगाव (ता.वडवणी) या छोट्याशा खेड्यातील एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले असून, मागील २५ वर्षांपासून पुण्यात पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. दरम्यान, गजेंद्र बडे हे मागील २५ वर्षांपासून पत्रकारिता व साहित्य क्षेत्रात कार्यरत आहेत. बडे यांनी आतापर्यंत विदर्भातील दैनिक देशोन्नतीचे पान २ वर

## बीडमध्ये रिपाइंची झिंदाबाद यात्रा

### किसन तांगडे: सहभागी होण्याचे आवाहन

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जम्मू-काश्मीर मधील पहलगाम येथे निरापराध भारतीय पर्यटकावर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला करून अठावीस भारतीयांची हत्या केली. दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारताने सिन्दूर ऑपरेशन यशस्वी करून पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांची ठिकाणे उद्ध्वस्त करून शंभर पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले. भारतीय सैनिकांनी अतुलनीय शौर्य दाखवून दहशतवाद्यांना धडा शिकविण्यासाठी सिन्दूर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल रिपब्लिकन पक्षाच्या वतीने सैनिकांच्या अभूतपूर्व शौर्याला सलाम करण्यासाठी व बलीदान दिलेल्या शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांच्या आदेशानुसार बीड जिल्हा रिपाइंच्या वतीने बीड शहरात शुक्रवार दि. ३० मे २०२५ रोजी सकाळी ठिक ११ वाजता युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या नेतृत्वाखाली भारत जिंदाबाद रॅली आयोजित करण्यात आली आहे. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून सुरुवात होऊन साहित्यरत आण्णाभाऊ साठे पुतळा मार्गे छ. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात येणार आहे.



भारतीय सैनिकांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी व शहीद जवानांना अभिवादन करण्यासाठी बीड शहरात रिपाईच्यावतीने दिनांक ३० मे २०२५ शुक्रवार रोजी काढण्यात येणाऱ्या भारत जिंदाबाद रॅलीत बीड तालुक्यातील रिपाई कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन रिपाइंचे बीड तालुकाध्यक्ष किसन तांगडे, बापू पवार, सुभाष तांगडे, भाऊसाहेब कांबळे, सतीश सिनगारे, भीमराव घोडेराव, राजाभाऊ वक्ते,राजाभाऊ कांबळे, देवानंद वाघमारे, भास्कर जावळे, भाऊसाहेब दळवी, भैय्या वाघमारे, रतन वाघमारे, रामेश्वर खळगे, नामदेव वाघमारे, नवनाथ डोळस, कैलास जोगदंड, विजय ओव्हाळ, प्रणव पायाळ,विशाल इंगोले, अजित सावंत, बंडू ठोंबरे, विशाल गव्हाणे, सिद्धार्थ वाघमारे, आकाश जावळे, विशाल पवार, राजेंद्र भालेराव, बबलू सोनवणे, मोहन खेमाडे, महादेव इनकर,विक्रम सोनवणे,तेजराज केंगार, दयानंद उबाळे, बाजीराव वाघमारे,अजय आठवले, अशोक दळवी, श्रीमंत जाधव, विकास वाघमारे, अमोल डावकर, लखन ठोकळ, संदेश मस्के आदींनी केले आहे.

## पंचायत समितीवर आंदोलनाची टांगती तलवार !

### मुक्ताराम गवळी: प्रशासन झोपलेलं असेल तर आम्ही त्यांना जागे करु

पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:पंचायत समितीच्या भ्रष्ट कारभाराचा मुद्दा आता टोकाला पोहचला आहे. दलित वस्तीतील रस्त्याच्या पुनःपुनः कामावरून आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते मुक्ताराम खेमाजी गवळी यांनी आता थेट पंचायत समितीच्या कार्यालयात जनावरं सोडून आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

गावातील दलित वस्तीमध्ये आधीच तयार झालेल्या सिमेंट काँक्रीट रस्त्यावर पुन्हा नव्याने सीसी रस्ता केला जात असल्याचा आरोप गवळी यांनी केला आहे. ४ मार्च २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार देऊनही प्रशासनाने याची गंभीर



दखल घेतलेली नाही. १२ मार्चला पंचायत समितीने संबंधित उपअभियंत्यांना चौकशीचे आदेश दिले, पण आजतागायत ना तपास झाला, ना अहवाल दिला गेला. या दिरंगाईविरोधात आता गवळी यांनी प्रशासनाला जागं करणार, अशी स्पष्ट भूमिका घेतली आहे.या प्रशासनाच्या पान २ वर

## वेलडन ऑलिंपियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी

# बीडच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी!

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत बीडच्या तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला. प्रमोद जी. महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या होलाम्बे अद्वैत सूरजने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र जिंकले. प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या गुजर अवधूत लिंब्रतनेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र




मिळवले. परळी येथील माध्यमिक विद्यालयाच्या भेल आरुष चंद्रकांत कोहलीनेही आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवला आणि प्रमाणपत्रासह आंतरराष्ट्रीय कांस्य पदक मिळवले.

या वर्षीच्या एसओएफ ऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील सुमारे लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता ज्यात बीडमधील २५३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सहभागींमध्ये बीडमधील प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, इंडो ब्रिटिश ग्लोबल स्कूल यासारख्या उल्लेखनीय शाळांचा समावेश होता. सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) ने दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे २०२४-२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या प्रसंगी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित पान २ वर

## बाप-लेकाचा शॉक लागून मृत्यू

पुण्यभूमी प्रतिनिधी

तलवाडा:गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील मारफळा येथील शेतकरी अभिमान लक्ष्मण कबले हे आपल्या गावा जवळ शेतातील मोटर चालू करण्यासाठी नेहमी प्रमाणे गेले होते मोटर मध्ये करंट उतरल्याने अभिमान लक्ष्मण कबले,वय वर्षे ५० हे चिकटले होते त्यांना वाचवण्यासाठी त्यांचा मुलगा ज्ञानेश्वर अभिमान कबले वय वर्षे २२ हे बापाला वाचवण्यासाठी गेला होता परंतू ते पण चिटकवून दोन्ही बाप लेकाचा करंट लागल्याने जागीच मृत्यू झाल्याची दुदैवी घटना दिं.२७ /५/२०२५ रोजी सकाळी सात वाजता मंगळवारी घटना घडली आहे. दोन्ही बाप लेकाचा शवविच्छेदन बीड जिल्हा रुग्णालयात करण्यात आला आहे. या घटनेने मारफळा गावात हळ हळ व्यक्त होत आहे.बीड येथे अकास्मत मृत्याची नोंद करण्यात आली आहे.

### टि.सी. हरवला आहे

प्राजक्ता महादेव जाधव या नावाचा इयत्ता बारावी पास चा टी. सी. गांजी ते केज बस प्रवासात हरवला आहे. सापडल्यास खालील नंबरवर संपर्क करावा.

- मो. ९९७०६११३२५